७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०६ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# अयोध्या झांकी असेल, तर काशी मथुरा किती लुटतील?

## राम मंदिर लुटणाऱ्यांना आता हिंदू माफ करणार नाही - उद्धव ठाकरे

**मुंबई (दै. संध्या)**

"आपण कट्टर आणि देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आणि भाबडे नक्कीच आहोत, पण मूर्ख नाही. आपल्या याच हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन जर कोणी राम मंदिर लुटत असेल, तर आता हिंदू त्यांना माफ करणार नाही," असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी चोरीच्या निषेधार्थ आयोजित 'रामरक्षा आंदोलना'त ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजप, पंतप्रधान आणि अयोध्येतील महंतांवर सडकून टीका केली.

अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिराच्या दानपेटीत झालेल्या कथित चोरी आणि निधी अपहाराच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरेंची शिवसेना आता कमालीची आक्रमक झाली आहे. या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी आज दादर येथील



ऐतिहासिक हनुमान मंदिरात (पुरातन वटवृक्ष मंदिर) ठाकरे गटाच्या वतीने 'रामरक्षा आंदोलना'ची हाक देण्यात आली आहे. या ठिकाणी रामरक्षा स्तोत्र आणि हनुमान चालिसाच्या पठणासह महाआरती करून या राज्यव्यापी आंदोलनाचा शंखनाद केला. भरपावसात शिवसैनिक या आंदोलनासाठी उपस्थित राहिले.


या रामरक्षा आंदोलनाचे आणि महाआरतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, यात सहभागी होण्यासाठी थेट अयोध्येहून काही साधू-संत आणि महंत दादरमध्ये दाखल झाले आहेत. पक्षाचे प्रवक्ते आनंद दुबे यांच्यासह हे सर्व पंडित व महंत या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवणार असून, राम मंदिरातील अपहाराविरोधात आवाज उठवणार आहेत.

या आंदोलनाचे नेतृत्व स्वतः माजी मुख्यमंत्री आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. त्यांच्यासोबत युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत यांच्यासह मुंबईभरातील शेकडो शिवसैनिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

राम मंदिर उभारणीतील शिवसेनेच्या योगदानाची आठवण करून देताना ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. "जेव्हा 'मंदिर वहीं बनायेंगे'च्या घोषणा दिल्या जात होत्या, तेव्हा शिवसैनिकांनी जेवढे काम केले, तेवढे इतर कोणीही केले नसेल. शिलापूजन, रथयात्रा आणि प्रत्यक्ष अयोध्येत जाऊन केलेली कारसेवा यात अनेक शिवसैनिकांनी रक्त सांडले, अनेकांचे जीव गेले."

उद्धव ठाकरे यांनी भाजपवर हिंदुत्वाचा केवळ राजकीय फायद्यासाठी वापर करत असल्याचा गंभीर आरोप केला. ते म्हणाले की, "ज्या राम मंदिरासाठी आपण मेहनत केली, तीच व्यक्ती आज पंतप्रधानपदी बसली आहे. मात्र, तिथे बसल्यानंतर त्यांनी सर्वात आधी कट्टर हिंदुत्ववादी शिवसेनेला नष्ट करण्यासाठी 'अफझल खाना'प्रमाणे विडा उचलला. याचे एकमेव कारण म्हणजे, त्यांना हिंदुत्वाचा गैरफायदा घ्यायचा होता आणि देशात केवळ शिवसेनाच त्यांच्यासमोर निधड्या छातीने उभी राहून जाब विचारू शकते, याची त्यांना भीती होती."

अयोध्येतील एका महंताने पंतप्रधान मोदींची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराजांशी केल्याच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "अयोध्येत बसलेल्या एका 'सागर' नावाच्या व्यक्तीने मोदींची तुलना शिवरायांशी केली आहे. एवढेच नाही, तर आज जशा 'ईडी'च्या धाडी पडतात, तशीच तुलना त्यांनी महाराजांच्या सुरतेवरील स्वारीशी केली. हे लोक आता आम्हाला शिवचरित्र शिकवणार का?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.



# पुणे-सातारा, रायगड-नाशिकला सोमवारपर्यंत 'रेड अलर्ट'

**पुणे (दै. संध्या)**

मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर अतिवृष्टी सुरूच आहे. त्यामुळे या भागांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. रायगड, नाशिक, पुणे-सातारा घाटमाथ्याला सोमवारी 'रेड अलर्ट' तर मुंबई, पालघर, रत्नागिरी, कोल्हापूर या जिल्ह्यांना मुसळधारेचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. राज्यातील पाऊस ८ जुलैपासून कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

राज्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार सुरू आहे. प्रामुख्याने मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर अतिवृष्टी सुरू आहे. उर्वरित भागात मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे.

सोमवारपर्यंत राज्यात पावसाचा जोर राहणार असून, मंगळवारी पाऊस मध्यम स्वरूपाचा राहण्याचा अंदाज आहे. तर बुधवारपासून पावसाचा जोर पूर्णपणे कमी होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# ठाकरेंचे उरलेले शिलेदारही शिंदेंच्या रडारवर; आमदारांची बोलावली तातडीची बैठक

**मुंबई (दै. संध्या)**

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला लागलेली गळती थांबण्याचे नाव घेत नाहीये. विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्याने ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर, पक्षात उरलेल्या आमदारांची मोट बांधून ठेवण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी (७ जुलै) संध्याकाळी ७ वाजता 'मातोश्री' निवासस्थानी सर्व आमदारांची तातडीची बैठक बोलावली आहे.

एकापाठोपाठ एक नेते पक्षाची साथ सोडत असल्याने ठाकरे गटाच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे. मंगळवारी होणाऱ्या या महत्त्वपूर्ण बैठकीत धोरणात्मक मुद्द्यांवर प्रामुख्याने चर्चा होण्याची शक्यता आहे. यामध्ये उर्वरित आमदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये आणि त्यांनी पक्ष सोडू नये, यासाठी त्यांच्याशी थेट संवाद साधला जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या



शेवटच्या आठवड्यातील रणनीती आणि आमदारांच्या सभागृहातील कामगिरीचा आढावा यावर चर्चा होईल. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ध्येयधोरणे आणि डॅमेज कंट्रोलबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटाच्या ९ पैकी ६ खासदारांनी एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दर्शवत उद्धव ठाकरेंची साथ सोडली होती. खासदार फुटीच्या या मोठ्या धक्क्यानंतर, आता शिंदे गटाने ठाकरे गटाचे उर्वरित आमदार आणि नगरसेवकांवर लक्ष केंद्रित केल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. राजकीय गणिते वेगाने बदलत असल्याच्या शक्यतेमुळे उद्धव ठाकरे अत्यंत सावधगिरीने पावले उचलत आहेत.

# लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना एसटीचे सुरक्षित पंख! – सरनाईक

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लालपरी' ही केवळ प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवणारी बस नसून, राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्ज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्याचे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ गेली अनेक दशके यशस्वीपणे पार पाडत असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाकडून शालेय वेळेत बसस्थानकांवर पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास मदत करतात. तसेच, प्रवासादरम्यान कोणतीही अडचण उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी एसटीने स्वतंत्र टोल-फ्री मदत केंद्र सुरू केले आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.



राज्यात दररोज सुमारे ३०,१७७ शालेय फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुरक्षित व नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या मुलींना १०० टक्के मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्के सवलत, मासिक विद्यार्थी पासवर ६६.६७ टक्के सवलत, तसेच उन्हाळी सुट्टी, परीक्षा, शैक्षणिक शिबिरे किंवा आजारी पालकांना भेटण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासासाठीही ५० टक्के सवलत देण्यात येते.

विद्यार्थ्यांसाठी NCMC स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रियाही सुरू असून, त्यामुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होणार आहे. याशिवाय कौशल्य सेतू अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत देण्यात येत आहे. तसेच मानव विकास योजनेअंतर्गत राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये ९६६ बसेसद्वारे ७३,६२१ मुलींना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देत शिक्षणातील समान संधीचे स्वप्न साकार करण्यात येत आहे.

"एसटीची 'लालपरी' ही आज केवळ रस्त्यावर धावणारी बस नाही, तर ती प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांची सारथी, प्रत्येक पालकाच्या विश्वासाची हमी आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी अविरत धावणारी ज्ञानगंगा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप अखंड तेवत ठेवण्याचे हे सामाजिक कार्य एसटी महामंडळ यापुढेही अधिक सक्षमपणे, संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेने सुरू ठेवेल," असा विश्वास परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग

भ्रष्टाचार विरोधी मोहीम सुरुच राहील




## वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी आरोग्य विभागाचे नियोजन

# वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स – आरोग्यमंत्री आबिटकर

**पंढरपूर (दै. संध्या)**

यंदाची आषाढी वारी वारकऱ्यांसाठी अधिक सुरक्षित आणि आरोग्यदायी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने प्रथमच अत्यावश्यक रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासोबतच सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्स, आपत्कालीन वैद्यकीय पथके आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थेच्या माध्यमातून लाखो वारकरी भाविकांना तातडीची उपचार सेवा देण्यासाठी सर्वंकष नियोजन करण्यात आले आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयात पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा सविस्तर आढावा घेत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.

आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, यंदाच्या वारीचे विशेष आकर्षण म्हणजे अत्यावश्यक रुग्णांना कमी वेळेत उच्चस्तरीय उपचार मिळावेत यासाठी प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. गंभीर रुग्णांना तातडीने विशेष रुग्णालयात हलविण्यासाठी



ही सेवा महत्त्वाची ठरणार आहे. याशिवाय, गर्दीच्या ठिकाणी जलद पोहोचण्यासाठी बाईक ॲम्बुलन्स, आधुनिक जीवनरक्षक उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका आणि प्रशिक्षित वैद्यकीय पथके सतत कार्यरत राहणार आहेत.

'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' आणि 'आरोग्यसंपन्न वारी' या डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून वारकरी भाविकांना पालखी मार्गावरच आरोग्यविषयक माहिती, मार्गदर्शन आणि तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रत्येक आरोग्य कर्मचारी आणि आशा सेविकेमार्फत आवश्यक आरोग्य संदेश, आजार प्रतिबंधक उपाययोजना आणि उपचार सेवा भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

वारकरी घरातून वारीसाठी प्रस्थान केल्यापासून ते सुखरूप घरी परतेपर्यंत त्यांच्या आरोग्याची सातत्याने काळजी घेण्याचे व्यापक नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक टप्प्यावर आरोग्य सेवा उपलब्ध राहतील, यासाठी संबंधित जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्याच्या सूचनाही यावेळी आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दिल्या. यंदाची आषाढी वारी केवळ भक्तीचा नव्हे, तर अत्याधुनिक आरोग्य व्यवस्थापनाचा आदर्श ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीच्या प्रारंभी आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर यांनी वारीसाठी आरोग्य विभागाने केलेल्या व्यापक नियोजनाची माहिती सादर केली. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, तात्पुरती वैद्यकीय पथके, औषधसाठा, रुग्णवाहिका सेवा, आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था तसेच मनुष्यबळाची उपलब्धता याबाबतची माहिती दिली.

या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर तसेच पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांतील प्रशासन व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष आणि दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.

# मुंबईत मनसेचा मोठा राडा: अमित साटम यांच्या विधानानंतर कार्यकर्ते आक्रमक

**मुंबई (दै. संध्या)**

काही दिवसांपूर्वी विधीमंडळ परिसरातील एका दुर्घटनेवर हसल्याचा अमित साटम यांचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओवरून राज ठाकरे यांनी साटम आणि भाजपवर सडकून टीका केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना अमित साटम यांनी थेट राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. "आम्ही घरात बसून सोशल मीडियावर पोस्ट लिहित नाही, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून काम करतो," असा टोला साटम यांनी लगावला. साटम यांच्या या विधानामुळे मनसे कार्यकर्ते आणि नेते चांगलेच दुखावले गेले.

अमित साटम यांच्या या वक्तव्यानंतर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी साटम यांचा खरपूस समाचार घेतला. "तुम्ही प्रत्यक्ष फिल्डवर असल्याचा दावा करता, मग तरीही अपघात का झाले?" असा बोचरा सवाल देशपांडे यांनी उपस्थित केला. या शाब्दिक चकमकीनंतर आज मनसैनिकांनी रस्त्यावर उतरून आपला रोष व्यक्त केला. भांडुपमधील डीएव्ही महाविद्यालयाबाहेर मनसैनिकांनी अमित साटम यांच्याविरोधात जोरदार निदर्शने केली आणि त्यांना काळे झेंडे दाखवले. आंदोलक कार्यकर्त्यांनी



साटम यांच्या बॅनरला काळे फासून आपला तीव्र संताप व्यक्त केला.

काही दिवसांपूर्वी अमित साटम यांनी विरोधक केवळ लक्ष भरकटवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले होते, "आम्ही केवळ बोलत नाही, तर विधानसभेत आवाज उठवून दोन दिवसांत महापालिकेच्या ७ अधिकाऱ्यांचे निलंबन केले आहे. पावसाळ्याच्या दिवसांत तुम्ही कधी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे किंवा राज ठाकरे यांना मुंबईच्या रस्त्यावर उतरून काम करताना पाहिले आहे का? मला जाणीवपूर्वक टार्गेट करण्याचे एकच कारण आहे, ते म्हणजे मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीतील गेल्या २५ वर्षांचे 'अंडरस्टँडिंग' (भ्रष्टाचार) आणि मलिद्याचे राजकारण आम्ही कायमचे बंद केले आहे."

## संपादकीय

# 'एक देश, एक निवडणुकी'चा धोका

भारतीय लोकशाहीची सर्वांत मोठी ताकद कोणती, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर आहे - वैविध्य. भाषा, संस्कृती, परंपरा, सामाजिक रचना आणि राजकीय आकांक्षा या सर्व बाबतीत भारत विविधतेने नटलेला आहे. ही विविधता सांभाळत लोकशाही टिकविण्याचे काम आपल्या राज्यघटनेने संघराज्य व्यवस्थेद्वारे केले आहे. म्हणूनच केंद्र आणि राज्ये यांच्यातील अधिकारांचे संतुलन ही केवळ प्रशासकीय बाब नसून भारतीय लोकशाहीचा मूलभूत पाया आहे.

मात्र, गेल्या काही वर्षांत या संघराज्य व्यवस्थेवर विविध दिशांनी दबाव वाढताना दिसतो. भाषिक प्रश्नांवरून निर्माण होणारे तणाव, राज्यपालांच्या भूमिकेबाबत निर्माण होणारे वाद, केंद्रीय तपास यंत्रणांचा वाढता वापर, मतदार यादीतील बदलांबाबत व्यक्त होणाऱ्या शंका... अशा अनेक प्रकारांमुळे केंद्र-राज्य संबंध अधिकच ताणले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर 'एक देश, एक निवडणूक' ही संकल्पना केवळ निवडणूक व्यवस्थेतील सुधारणा म्हणून पाहता येणार नाही; ती भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या स्वरूपातच बदल घडवून आणणारी संकल्पना ठरू शकते. सध्या संसदेसमोर असलेल्या १२९व्या घटनादुरुस्ती विधेयकाचा उद्देश लोकसभा आणि सर्व राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे हा आहे. सध्या भारतात जवळपास दरवर्षी कुठे ना कुठे निवडणुका होत असतात. त्यामुळे प्रशासनावर ताण येतो, खर्च वाढतो आणि विकासकामांवर परिणाम होतो, असा यामागचा युक्तिवाद आहे. पहिल्या दृष्टिक्षेपात हा प्रस्ताव आकर्षक वाटू शकतो; परंतु, त्याची अंमलबजावणी कशी होणार, याकडे लक्ष दिले तर अनेक गंभीर घटनात्मक प्रश्न उभे राहतात.

विधेयकानुसार पुढील लोकसभा निवडणूक झाल्यानंतर राष्ट्रपती अधिसूचना काढतील आणि त्याच क्षणापासून सर्व राज्य विधानसभांचा कार्यकाळ लोकसभेशी जोडला जाईल. याचा अर्थ असा की, एखाद्या राज्यात नुकतीच निवडणूक झाली असली तरी त्या विधानसभेचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होणार नाही. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात २०२८ मध्ये विधानसभा निवडणूक झाली आणि २०२९ मध्ये लोकसभा निवडणूक झाली, तर महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २०३३ पर्यंत न जाता २०२९ मध्येच संपेल. त्यानंतर महाराष्ट्रातील मतदारांना एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभेसाठी मतदान करावे लागेल.

याहूनही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, एखादे राज्य सरकार मध्यावधीत कोसळले तर काय? आजच्या व्यवस्थेत अशा परिस्थितीत नव्याने निवडणूक होते आणि नव्या सरकारला पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ मिळतो. परंतु, या विधेयकात वेगळीच तरतूद आहे. मध्यावधी निवडणुकीत निवडून आलेल्या सरकारला पाच वर्षांचा कार्यकाळ मिळणार नाही; मूळ विधानसभेच्या उर्वरित कालावधीपुरतेच ते सरकार सत्तेत राहील. याचे उदाहरण पाहू. समजा २०२९ मध्ये महाराष्ट्रात निवडणूक झाली आणि २०३१ मध्ये सरकार पडले. सध्याच्या नियमांनुसार नव्या सरकारचा कार्यकाळ २०३६ पर्यंत असला असता. परंतु या विधेयकानुसार ते सरकार केवळ २०३४ पर्यंतच राहील, कारण त्या वर्षी पुन्हा संपूर्ण देशात एकत्रित निवडणुका होणार आहेत.

ही तरतूद भारतीय लोकशाहीत पूर्णपणे नवी आहे. जगातील प्रमुख लोकशाही व्यवस्थांमध्ये अशा प्रकारची व्यवस्था जवळजवळ कुठेही आढळत नाही. लोकशाहीतील एक मूलभूत तत्त्व म्हणजे मतदाराने निवडून दिलेल्या सरकारला निश्चित कार्यकाळ मिळणे. मतदार आणि त्याचा प्रतिनिधी यांच्यातील विश्वास याच तत्त्वावर उभा असतो. भारतीय सर्वोच्च न्यायालयानेही मतदारालाच राजकीय सार्वभौमत्वाचा खरा स्रोत मानले आहे. निवडणूक म्हणजे केवळ सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया नव्हे; ती सरकारला जबाबदार धरण्याची आणि अपयशी सरकार बदलण्याची लोकांची घटनात्मक शक्ती आहे. म्हणूनच निवडणूक व्यवस्थेतील कोणताही बदल हा मतदाराचा अधिकार अधिक सक्षम करणारा असायला हवा; तो कमी करणारा नसावा.

## संस्कृत सुभाषित

एकोदरसमुद्भूता एकनक्षत्रजातका: ।
न भवान्ति समा: शील यथा बदरिकाष्टका: ॥

अर्थ ; एकाच बोराच्या झाडावर उत्पन्न झालेले काटे एक दुसऱ्यासारखे नसतात तसेच एका आईच्या पोटी जन्मलेले, एकाच नक्षत्रावर जन्मलेले सर्व लोक समान नसतात.

## आगामी साप्ताहिकी

६ जुलै २०२६ सोमवार
सूर्याचा पुनर्वसु नक्षत्रप्रवेश वाहन : घोडा
गोविंद महाराज पुण्यतिथी – सोनगिरी (धुळे)
७ जुलै २०२६ मंगळवार
कालाष्टमी
संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान – देहू
८ जुलै २०२६ बुधवार
संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान – आळंदी
९ जुलै २०२६ गुरुवार
राजमाता जिजाऊसाहेब भोसले पुण्यतिथी – (तिथीप्रमाणे)
१० ऑगस्ट २०२६ शुक्रवार
योगिनी स्मार्त एकादशी
संत निवृत्तिनाथ यात्रा – त्र्यंबकेश्वर
भाऊसाहेब वैध पुण्यतिथी – नागपूर
शिवगीर – सायन (अमरावती)
हरिबुवा पुण्यतिथी – अकोट (अकोला)
११ जुलै २०२६ शनिवार
भागवत एकादशी
पारशी अस्पंदार्मद मासारंभ
तुळशीबन महाराज पुण्यतिथी – महागांव (यवतमाळ)
संत निवृत्तिनाथ पुण्यतिथी
विश्वजनसंख्या दिन
१२ जुलै २०२६ रविवार
प्रदोष
शिवरात्री

## उपदेशकथा

### व्यसन

एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झालेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे. कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, विडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटे विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.

कथा उपदेश : बिडी–सिगरेटचं व्यसन फार घातक आहे. ते लावून घेऊ नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:सौभाग्य १५:५०:२८ |
| ६ जुलै २०२६ | करण:वणिज १३:४७:२८ |
| सोमवार | करण:विष्टि २५:४१:२२+ |
| | सूर्य:मिथुन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मीन०९:५७:०६ |
| श्रावणशके संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – मोहरम |
| अयन– दक्षिणयन | तारीख – २० |
| मास– निज ज्येष्ठ | |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | सूर्याचा पुनर्वसु नक्षत्रप्रवेश |
| तिथि:षष्टी १३:४७:२८ | वाहन : घोडा |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | गोविंद महाराज पुण्यतिथी |
| १६:०७:२३ | – सोनगिरी (धुळे) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | | | | | | |
| 7 | 8 | 1 | 9 | 5 | | 6 | | |
| | | | 6 | 3 | | | 1 | 7 |
| | 5 | 2 | | 7 | 6 | | 3 | |
| | | | | | | | | |
| | 9 | | 8 | 1 | | 2 | 7 | |
| 1 | 4 | | | 8 | 3 | | | |
| | | 8 | | 4 | 7 | 1 | 5 | 9 |
| | | | | | | | 4 | |

PRESS SERVICES OF INDIA

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

#### सूडोकु क्र. १००१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 2 | 9 | 3 | 7 | 4 | 8 | 1 | 5 |
| 4 | 3 | 7 | 1 | 5 | 8 | 9 | 6 | 2 |
| 5 | 1 | 8 | 6 | 9 | 2 | 4 | 7 | 3 |
| 8 | 5 | 1 | 7 | 4 | 6 | 3 | 2 | 9 |
| 3 | 7 | 2 | 5 | 8 | 9 | 6 | 4 | 1 |
| 9 | 4 | 6 | 2 | 3 | 1 | 5 | 8 | 7 |
| 1 | 8 | 5 | 9 | 6 | 7 | 2 | 3 | 4 |
| 7 | 9 | 4 | 8 | 2 | 3 | 1 | 5 | 6 |
| 2 | 6 | 3 | 4 | 1 | 5 | 7 | 9 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२५३ – मिंडॉगास लिथुएनियाच्या राजेपदी.
- १३४८ – युरोपमधील प्लेगच्या प्रादुर्भावानंतरपोप क्लेमेंट सहाव्याने पोपचा फतवाकाढून ज्यू व्यक्तींना अभय दिले.
- १४८३ – रिचर्ड तिसरा ईंग्लंडच्या राजेपदी.
- २००३ – कॉर्सिकातील निवडणूकात नागरिकांनी फ्रांसपासून स्वातंत्र्य नाकारले.
- २००८ – पुरातत्व विभागाने एका मोहिमेत दक्षिण मिस्त्रमध्ये काहिरापासून ४०० किलोमीटर अंतरावर असलेले ऐतिहासिक शहर अब्योडोसचा दक्षिण भाग उम्म–एल–गाबमध्ये ५ हजार वर्ष जुने शाही कब्रस्थान शोधून काढले.

### राष्ट्रीय

- १८९२ – दादाभाई नौरोजींची ब्रिटीश संसदेचे सर्वप्रथम भारतीय सभासद म्हणून निवड.
- २००८ – बिहारच्या दरभंगा येथील रहिवासी संजय झा यांना अमेरिकेत प्रतिष्ठित गेराल्ड लोएब पुरस्कार मिळाला. संजय झा हा पुरस्कार मिळविणारे पहिलेच भारतीय पत्रकार ठरले.

### जन्म

- १९०१ – डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, भारतीय जनसंघाचे पहिले नेतेचा जन्म.
- १९५८ – मार्क बेन्सन, इंग्लिश क्रिकेट खेळाडूचा जन्म.
- १९७७ – मखाया एनटिनी, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडूचा जन्म.

### निधन

- १२४९ – अलेकझांडर दुसरा, स्कॉटलंडचा राजा यांचे निधन.
- १५५३ – एडवर्ड सहावा, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १७६२ – पीटर तिसरा, रशियाचा झार यांचे निधन.

## : SMS :

Ek yug tha jab log apne ghar ke dwar pe likhte the: ATITHI DEVO BHAVA
Phir likha: SHUBH LABH
Phir likhne lage: U R WELCOME
Aur ab likhte hain: KUTTON SE SAVDHAN

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.५ | २२.९ |
| अहमदनगर | २६.३ | २२.४ |
| अकोला | ३०.१ | २४.९ |
| अमरावती | ३०.३ | २५.३ |
| बीड | ३२.२ | २५ |
| भंडारा | ३७.५ | २५.८ |
| बुलढाणा | ४७ | ३२.८ |
| चंद्रपूर | ३२.३ | २५.६ |
| चेन्नई | ३६.२ | ३०.२ |
| नवी दिल्ली | ४५.१ | ३६.७ |
| धुळे | ३४.८ | २४.८ |
| गोंदिया | ३७.५ | २५.३ |
| जळगाव | २७ | २४.७ |
| कोल्हापूर | २५.२ | २२.५ |
| लातूर | २५.८ | २३.१ |
| मुंबई | ३१.७ | २७.७ |
| नागपूर | ३६.८ | २४.९ |
| नांदेड | ३१.६ | २३.६ |
| नंदूरबार | २९.८ | २५.४ |
| नाशिक | २६ | २२.९ |
| पुणे | २४.५ | २२.५ |
| पंढरपूर | २७.२ | २४.१ |
| सातारा | २५.३ | २१.९ |
| सांगली | २६.३ | २३.२ |
| सोलापूर | २९.७ | २३.९ |
| वर्धा | ३१.५ | २५.६ |
| वाशिम | २६.२ | २३.२ |
| यवतमाळ | २६.७ | २५.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : पूर्व प्रकृतीचा उत्साह, मिळणारी कामे यांच्या शिकस्तीच्या प्रयत्नातून चांगला प्रतिसाद मिळेल.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा :दक्षिण आर्थिकदृष्ट्या गरज असेल तेवढे मिळत राहील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना आपले आसन बळकट करता येईल. एखादा सन्मान नावलौकिकात भर टाकतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : पश्चिम सामाजिक यशात थोरामोठ्याचा सहभाग अपेक्षित राहील.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व आर्थिक व्यवहार अगदी बेसावध अवस्थेत करू नका. एखादी चूक फटका देणारी ठरेल.

**धनु:** शुभ रंग :लाल, शुभ दिशा :पश्चिम वैवाहिक जीवनात घडणाऱ्या कुरबुरीचे परिणाम संततीवर होत असतात याचा विचार करणे महत्त्वाचे ठरेल.

**कर्क :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व वास्तूबाबत महत्त्वाचे प्रश्न रेंगाळतील. मुलाविषयीचे प्रश्नाच्या बाबतीत बारकाईने लक्ष घालावे लागेल.

**मकर:** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम एखादी मोठी गुंतवणूक आगामी काळासाठी फायद्याची ठरणार आहे. युवकांनी भडक साहित्य वाचू नये.


**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: दक्षिण नोकरी–व्यवसायात महत्त्वाच्या कामात होणारा विलंब वेळीच थांबून प्रगतीच्या वाटेने आपली वाटचाल होईल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम सरकारी कामांना प्राधान्य द्या. व्यसन प्रलोभन यापासून आवर्जून दर रहा. युवकांनी प्रलोभने टाळा.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम वृद्धांना परमेश्वर चिंतन किंवा ध्यानधारणा यातून मन:शांती मिळेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पूर्व कोणताही मुद्दा प्रतिष्ठेपर्यंत जाणार नाही याची काळजी घ्या. युवकांनी कोठेही बेसावध राहू नका.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००२



### आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे–येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

### उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दु:ख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा–राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव
६५. तात्पर्य
६६. दु:ख, हळहळ

उत्तर उद्याच्या अंकात

#### जम्बो शब्दकोडे क्र. १००१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ. पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१.कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

उभे उत्तर : १.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९.मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२.मात्र ७३.कोर ७५.वार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राज्य महामार्गांवर आधुनिक जनसुविधा केंद्रांची उभारणी; पीडब्ल्यूडी प्रकल्पाला गती

पुणे (दैनिक संध्या) : राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पी. डब्ल्यू. डी.) अखत्यारीतील असलेल्या राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गांवर प्रवाशांसाठी आधुनिक जनसुविधा केंद्र (प्रसाधनगृहे) उभारण्याच्या कामाला गती देण्यासाठी राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. विशेषतः महिला प्रवाशांसाठी स्वच्छ व सुरक्षित प्रसाधनगृहांची कमतरता लक्षात घेऊन ही योजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य महामार्गांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असली, तरी सार्वजनिक प्रसाधनगृहांची संख्या त्या मानाने कमी आहे. यापूर्वी हॉटेल, ढाबे, पेट्रोल पंप, तसेच सार्वजनिक सहभागातून काही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मात्र, त्या पुरेशा नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगत नियोजनबद्ध पद्धतीने जनसुविधा केंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सूचनेनुसार प्रत्येक विभागीय कार्यालयाने प्रथम राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्गांवरील योग्य जागांची निवड करावी. त्यानंतर इच्छुक खासगी संस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था किंवा व्यक्तींकडून प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत. जाहिरात फलक व उपाहारगृहातून उत्पन्न मिळू शकणाऱ्या ठिकाणी सर्वाधिक महसूल देणाऱ्या संस्थेला नियमानुसार काम देण्यात येईल.



### सोना आई इंग्लिश स्कूलमध्ये मुलींच्या सुरक्षिततेवर कार्यशाळा

पुणे (दैनिक संध्या) : भेकराईनगर येथील सोना आई  इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये मुलींच्या सुरक्षिततेवर कार्यशाळा घेण्यात आले होते पापडे वस्ती येथे फुरसुंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींच्या सुरक्षितते संदर्भात विशेष जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली दामिनी फुरसुंगी मार्शल मनीषा साळवे व पल्लवी गुंगले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. इयत्ता ९ वी ते १० वीच्या विद्यार्थिनींना सायबर सुरक्षा, विद्यार्थी सुरक्षा, गुड टच बॅड टच, सुरक्षित व असुरक्षित वर्तन, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, पौष्टिक आहार, आत्मविश्वास वाढवणे तसेच सोशल मीडियाचे अतिवापराचे दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली, यावेळी POCSO Act 2012, महिला व बालकांसाठी हेल्पलाइन क्र. १०९१, ११२, १०९८ तसेच सायबर सुरक्षा हेल्पलाइन १०३० यांची माहिती देण्यात आली, यावेळी शाळेचे प्राचार्य ए एल नरसिंग राव, सुवर्णा राव, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता बनकर, सोनिया राव, राज लक्ष्मण राव, मनोहर बाबु रेड्डी, सोनिया मोरे, संदेश मोरे, आदि उपस्थित होते.

### पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत 'निवडणूक साक्षरता क्लब' स्थापन करण्याचे निर्देश

पुणे (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब स्थापन करणे गरजेचे आहे. क्लबची स्थापना केल्याची माहिती संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे पाठवावी, असे निर्देश विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालिका डॉ. सविता कुलकर्णी यांनी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिले. डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करण्यासंदर्भात निर्देश प्राप्त झाले आहे. त्यानुसार महाविद्यालयांत निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करावी. त्यासाठी प्रत्येक संस्थेत एका शिक्षकाची, प्राध्यापकाची ईएलसी समन्वयक नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. समवयस्कांच्या माध्यमातून सहभाग वाढविण्यासाठी आवर्तन तत्त्वावर कॅम्पस ॲम्बेसेडर नियुक्त करण्यास प्रोत्साहन द्यावे. तसेच संस्थेत निवडणूक साक्षरता आणि जागरूकता उपक्रम राबविणे आवश्यक आहे. या उपक्रमांमध्ये भारताचे संविधान, लोकशाही मूल्ये आणि निवडणूक प्रक्रिया, यावर आधारित जागरूकता सत्रे, निवडणूक आयोगाची भूमिका आणि जबाबदाऱ्यांची ओळख करून देणे, मतदार याद्या तयार करणे आणि त्या अद्ययावत करणे, याबाबतची मूलभूत माहिती देणे, मतदार नोंदणीची कार्यपद्धती आणि मतदार सेवांविषयी जागरूकता निर्माण करणे, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अर्थात एसआयआर आणि मतदार यादीशी संबंधित इतर उपक्रमांची माहिती देणे, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटबाबत प्रात्यक्षिके आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, मतदान केंद्र स्तरावरील कार्यपद्धती, मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी प्रक्रियेची माहिती देणे, प्रश्नमंजूषा, वादविवाद, मॉक पोल (अभिरूप मतदान), निबंध स्पर्धा आणि इतर सहभागात्मक उपक्रम राबविणे, नैतिक आणि माहितीपूर्ण मतदानाला प्रोत्साहन देणारे कार्यक्रम राबविणे, निवडणुकांशी संबंधित चुकीच्या बातम्या आणि अफवा ओळखून त्यांना चोख प्रत्युत्तर देणारे उपक्रम राबविणे आदी उपक्रमांची अंमलबजावणी करावी, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.



# लेखक हे साहित्यशारदेचे मानकरी : प्र. के. घाणेकर

## प्रसाद प्रकाशनतर्फे पांडुरंग बलकवडे, आशुतोष बापट यांना पुरस्कार प्रदान; एकाच वेळी २४ आध्यात्मिक पुस्तकांच्या प्रकाशनाचा विक्रम

पुणे (दै. संध्या)

लेखक हे साहित्यशारदेचे मानकरी आहेत. त्यांनी आपले ज्ञान पुस्तकांच्या माध्यमातून वाचकांसमोर आणले आहे. आपल्याला आवडलेल्या पुस्तकांच्या लेखकांशी संवाद साधावा. त्या संवादातून विचारांची देवाणघेवाण होऊन आपले ज्ञान वृद्धिंगत होईल, असे मत ज्येष्ठ दुर्ग अभ्यासक आणि लेखक प्र. के. घाणेकर यांनी व्यक्त केले.

प्रसाद प्रकाशन आणि अनाहत प्रकाशनच्या वतीने नवी पेठ येथील एस. एम. जोशी सभागृहात पुरस्कार प्रदान तसेच २४ पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.




ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना कै. मनोहर य. जोशी स्मृती गौरव पुरस्कार, तर भारतीय विद्यातज्ज्ञ आशुतोष बापट यांना कै. मंजिरी मनोहर जोशी स्मृती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, प्रसाद प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस उपस्थित होत्या.

प्र. के. घाणेकर म्हणाले, देवावर माझी श्रद्धा आहे. माझ्यासाठी पूर्व दिशेला उगवणारा तेजस्वी सूर्य हा देव आहे. सूर्यामुळेच आपण जगतो. त्यामुळे सूर्यनारायणाला आपण देव मानतो, यामागे शास्त्रीय कारण आहे. माझा जन्म कोकणात झाला आहे. त्यामुळे समुद्र हा देखील माझ्यासाठी देवता आहे.

ते पुढे म्हणाले, हिमालयातील मुक्तिनाथ, लाहौल-स्पीती आणि काझा परिसरात आढळणारे शालिग्राम हे प्रत्यक्षात अमोनाइट प्रकारचे जीवाश्म आहेत. दगडात देव पाहायचा की देवामध्ये दगड, हा प्रत्येकाच्या श्रद्धेचा आणि दृष्टीचा विषय आहे.

पांडुरंग बलकवडे म्हणाले, आजच्या २१ व्या शतकामध्ये विज्ञान प्रगत होत आहे. त्यामुळे जगात समृद्धी येत आहे. परंतु विज्ञानाला अध्यात्माची किंवा विचारांची जोड नसेल, तर जगात जे घडत आहे ते आपण पाहत आहोत. हजारो वर्षांपूर्वी आपली संस्कृती जगाच्या गुरुस्थानी होती. उद्याही जगाला दिशा देण्याचे काम आपल्या देशातील विचारवंतांना करावे लागेल. विश्वाचे कल्याण चिंतणारी आपली संस्कृती आहे.

आशुतोष बापट म्हणाले, भारतीय संस्कृती, इतिहास आणि वारसा यांच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होत आहे. भारताचा वारसा आणि स्थापत्यवैभव जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे, ही इच्छा असून या पुरस्कारामुळे आणखी प्रोत्साहन मिळाले आहे.

डॉ. उमा बोडस म्हणाल्या, प्रसाद प्रकाशनला ८० वर्षे पूर्ण होत आहेत. केवळ पुस्तके छापणे हेच प्रकाशन संस्थेचे काम नसून लेखकांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्याची सामाजिक जबाबदारीही प्रकाशन संस्थेची असते. प्रत्येक पुस्तकामागे लेखकाची साधना असते. वाचनसंस्कृती जिवंत ठेवणे ही प्रसाद प्रकाशनची जबाबदारी असून भविष्यातही ही परंपरा अखंडपणे सुरू राहील.

## एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त भारतरत्न महर्षी कर्वे यांच्या पुतळ्याचे राज्यपालांच्या हस्ते अनावरण

पुणे (दै. संध्या)

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी उभारलेल्या स्त्री शिक्षणाच्या महान परंपरेला पुढे नेत एसएनडीटी महिला विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात देशासाठी आदर्श कार्य केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे हे विद्यापीठ बहुविषयक शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि जागतिक दर्जाच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे वाटचाल करत असून देशातील अग्रगण्य विद्यापीठांमध्ये स्थान मिळविण्याची क्षमता त्यात असल्याचा विश्वास महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री. जिष्णू देव वर्मा यांनी व्यक्त केला.



एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या १११ व्या स्थापना दिनानिमित्त कर्वे रस्ता येथे आयोजित कार्यक्रमात भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुतळ्याचे अनावरण तसेच 'इनोव्हेशन महाकुंभ २.०' चे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील, राज्यसभा सदस्य मेधा कुलकर्णी, राज्यपालाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलगुरू प्रा. उज्ज्वला चक्रदेव, कुलसचिव प्रा. डॉ.विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद व शैक्षणिक परिषदेचे सदस्य, प्राध्यापक, माजी विद्यार्थीनी आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. राज्यपाल श्री. देव वर्मा म्हणाले, भारतरत्न महर्षी कर्वे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य हे सामाजिक परिवर्तनाचे नव्हे तर राष्ट्रनिर्मितीचे कार्य होते. स्त्री शिक्षणाद्वारे महिलांचे सक्षमीकरण हा विकसित भारताचा पाया आहे. विद्यापीठांनी केवळ अध्यापन केंद्र न राहता संशोधन, नवोपक्रम, समस्या निराकरण आणि राष्ट्रनिर्मितीची केंद्रे बनले पाहिजेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, हवामान बदल, आरोग्य, कृषी आणि सामाजिक उद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत विद्यार्थिनींनी संशोधन व नवोपक्रमावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

'इनोव्हेशन महाकुंभ २.०' हे संशोधनाचे उद्योगांमध्ये, कल्पनांचे उपयुक्त उपायांमध्ये आणि तरुणांच्या संकल्पनांचे स्टार्टअपमध्ये रूपांतर घडविणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे सांगत त्यांनी विकसित भारत २०४७ साकार करण्यासाठी महिलांच्या नेतृत्वाखालील विकास अपरिहार्य असल्याचे राज्यपालांनी नमूद केले.

## स्टील व्यावसायिकाच्या गोदामावर गोळीबार; राजस्थानातून एकाला अटक

पुणे (दै. संध्या)

उरुळी देवाची येथील स्टील व्यावसायिकाच्या गोदामावर कोट्यवधी रुपयांच्या खंडणीसाठी करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणी पुणे पोलिसांनी राजस्थानातून पवन कुमार याला अटक केली आहे. घटनेनंतर फरार झालेल्या आरोपीला राजस्थान-पंजाब सीमेवरील परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याला ट्रान्झिट रिमांडवर पुण्यात आणण्यात येत असून, या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

ही घटना २२ जून रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास मंतरवाडी-कात्रज बायपास रोडवरील उरुळी देवाची परिसरात घडली होती. लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या नावाने स्टील व्यावसायिकाकडे कोट्यवधी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. त्यानंतर गोदामाबाहेर गोळीबार करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी फुरसुंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपास गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाकडे सोपवण्यात आला आहे. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळासह परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. आरोपींनी वापरलेल्या पळून जाण्याच्या मार्गाचा मागोवा घेत उंड्री, नाशिक फाटा, नाशिक, सूरत आणि राजस्थानपर्यंतच्या सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करण्यात आले. घटनेनंतर आरोपीने मोटारसायकल एका गृहनिर्माण सोसायटीजवळ सोडल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर त्याने सलग दोन रिक्षांचा वापर केला, पुढे कॅबने नाशिक गाठले आणि तेथून बसने सूरतमार्गे राजस्थानात पलायन केले. तांत्रिक पुरावे आणि सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या हालचालींचा संपूर्ण मागोवा घेतला.

## विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत घरभेटींची जिल्हाधिकारी डुडी यांच्याकडून पाहणी

पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण  कार्यक्रमांतर्गत बूथस्तरीय अधिकारी सध्या घरोघरी जाऊन मतदारांना

प्रगणना नमुना अर्ज वितरित करून आवश्यक माहिती संकलित करत आहेत. या घरभेटी मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज शिवाजीनगर, हडपसर आणि पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्र परिसरांना भेट दिली.



यावेळी त्यांनी बीएलओंकडून सुरू असलेल्या घरभेटींच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच मतदारांना प्रगणना फॉर्मचे वितरण, माहिती संकलन आणि पडताळणीची प्रक्रिया तपासली. नागरिकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी कोणताही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना बीएलओंना दिल्या.

जिल्हाधिकारी डुडी यांनी मतदार यादीतील माहिती अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह करण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. नागरिकांनी बीएलओंना आवश्यक कागदपत्रे व अचूक माहिती वेळेत उपलब्ध करून देत या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

## पुण्याच्या धरणसाखळीत पाणीसाठा केवळ १६.०६ टक्के; गेल्या वर्षाच्या तुलनेत मोठी तूट

पुणे (दै. संध्या)

शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या खडकवासला धरणसाखळीतील चार धरणांमध्ये शनिवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ४.६८ TMC पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे. हा साठा एकूण क्षमतेच्या १६.०६ टक्के इतका आहे. गेल्या वर्षी याच दिवशी या धरणसाखळीत १७.१५ TMC म्हणजेच ५८.८३ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा पाणीसाठ्यात लक्षणीय तूट दिसून येत आहे.

खडकवासला धरणात दिवसभरात १३ मिमी पावसाची नोंद झाली. धरणात सध्या ०.३० TMC म्हणजेच १४.९७ टक्के पाणीसाठा असून, पाणीपातळी ५७८.२७ मीटरवर आहे. धरणाच्या सांडव्यावरून अद्याप पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला नाही. पानशेत धरण परिसरात ३३ मिमी पाऊस झाला. पानशेतमध्ये २.३० TMC पाणीसाठा असून तो २१.६३ टक्के आहे. धरणाची पाणीपातळी ६१४.६० मीटर नोंदवण्यात आली आहे. वरसगाव धरण परिसरात ३० मिमी पावसाची नोंद झाली. धरणात २.०५ TMC म्हणजेच १५.९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, पाणीपातळी ६१४.९० मीटरवर आहे. टेमघर धरण परिसरात सर्वाधिक ५५ मिमी पाऊस झाला. मात्र, धरणातील पाणीसाठा केवळ ०.०३ TMC म्हणजेच ०.९२ टक्के आहे. टेमघरची पाणीपातळी ६६३.२० मीटरवर नोंदवली गेली आहे.

चारही धरणांमध्ये एकूण २७२ MCFT इतकी आवक झाली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आगामी दिवसांत धरणसाखळीतील जलसाठ्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे. मात्र, गेल्या वर्षाच्या तुलनेत साठा कमी असल्याने पुणेकरांसाठी पुढील पावसाळी दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत.

# "नदी ही जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे" – डॉ. राजेंद्र सिंह

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे पुनर्जीवित नदी 'बद्दह' पुस्तकाचे प्रकाशन

पुणे (दै. संध्या)

"नदी म्हणजे केवळ पाणी वाहणारा कालवा नव्हे, तर ती संस्कृती आणि निसर्ग यांना जोडणारा प्रवाह असून जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे. नद्या कोरड्या पडल्या, तर त्यासोबत संस्कृती आणि सभ्यतेचाही ऱ्हास होतो." असे प्रतिपादन जलतज्ञ ज्येष्ठ जलसंवर्धनतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले. पुण्यातील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) प्रेक्षागृह येथे 'एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने आयोजित पुनर्जीवित नदी 'बद्दह' या त्यांच्या हिंदी व रिटा रॉड्रिग्स यांनी अनुवादित केलेल्या मराठी आवृत्तीचा प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे जेष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे व जेष्ठ समाजसेवक जयाजी पाईकराव यांच्या हस्ते आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्याध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे व संस्थापक कुलगुरू प्रा. डॉ. गोपालकृष्ण जोशी यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभ आशीर्वादाने हा सोहळा पार पडला.

यावेळी संचालक - स्ट्रॅटेजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम. चाटे, प्रोजेक्ट डायरेक्टर प्रा. प्रभा कासलीवाल, कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, उद्योग क्षेत्रातील तसेच जलसंवर्धन व पर्यावरण तज्ञ उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सिंह म्हणाले " पुणे हे संस्कृती, शिक्षण आणि विचारांचे शहर आहे. मात्र, या शहरातून वाहणाऱ्या नद्यांची अवस्था चिंताजनक आहे. नद्यांचे स्वरूप बदलणे हे त्या भागातील संस्कृतीचा ह्यास होण्याचे लक्षण आहे. सध्याच्या काळात नद्यांना पुन्हा जीवित करण्याची गरज



आहे आणि जलसंपत्तीचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे."

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे याप्रसंगी बोलताना म्हणाले, "पर्यावरण संरक्षण केवळ धोरणांमधून किंवा आंतरराष्ट्रीय करारांमधून साध्य होणार नाही. हा बदल विद्यापीठे, तरुणाई आणि समाजाच्या सक्रिय सहभागातूनच घडेल. जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास हे परस्परांशी जोडलेले विषय असून शिक्षण, संशोधन आणि समाजाभिमुख उपक्रमांचा समन्वय ही काळाची गरज आहे."

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या शाश्वत विकास, पर्यावरणीय जबाबदारी, जलसंवर्धन आणि सामाजिक सहभाग या मूल्यांवर आधारित विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. स्वाती कराड चाटे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच पर्यावरण-जागरूक आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक म्हणून घडविणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. पुनर्जीवित नदी 'बद्दह' हे पुस्तक जलसंवर्धनाच्या विचारांना समाजात नवी दिशा देणारे, लोकसहभागाला प्रेरणा देणारे आणि नव्या पिढीसाठी मार्गदर्शक संदर्भग्रंथ ठरेल."

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने डॉ. राजेंद्र सिंह यांच्या पुनर्जीवित नदी 'बद्दह' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. "जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षण हे विषय केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित राहू नयेत, तर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीत उतरावेत, या उद्देशाने एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने या पुस्तकाच्या प्रकाशनाचा पुढाकार घेतला आहे", असे त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रभा कासलीवाल यांनी केले.

# वडगाव निंबाळकर–कोऱ्हाळे रस्त्यावरील चुकीच्या विद्युत पोलांची अखेर संयुक्त पाहणी

**वडगाव निं. (दै. संध्या) :**

वडगाव निंबाळकर - मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत वडगाव निंबाळकर–कोऱ्हाळे खुर्द रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम सुरू असताना रस्त्यालगत चुकीच्या पद्धतीने उभारण्यात आलेल्या विद्युत पोलांमुळे निर्माण झालेल्या वादाची प्रशासनाने अखेर गंभीर दखल घेतली आहे. आंदोलनाचा इशारा मिळाल्यानंतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त स्थळ पाहणी करत परिस्थितीची पाहणी केली.



कोऱ्हाळे खुर्दचे माजी ग्रामपंचायत सदस्य सुरज खोमणे यांनी ग्रामस्थांच्या वतीने या समस्येबाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेले काही विद्युत पोल भविष्यातील रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणार असल्याचे त्यांनी वारंवार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र, कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांकडून सातत्याने चालढकल होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता.

याप्रकरणी आंदोलनाचा इशारा देत संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाने तातडीने दखल घेत उपकार्यकारी अभियंता सोमेश्वर अरविंद अंभोरे, वडगाव निंबाळकरचे नवनियुक्त कनिष्ठ अभियंता किशोर कहार तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक विभागाचे अधिकारी सुबोध निंबाळकर यांनी संयुक्तपणे घटनास्थळी पाहणी केली.

पाहणीदरम्यान काही ठिकाणी विद्युत पोलांचे काम नियोजनशून्य पद्धतीने झाल्याचे प्राथमिक स्तरावर निदर्शनास आल्याची माहिती मिळाली. यामुळे कामाच्या दर्जा व नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित त्रुटी तातडीने दूर करण्याबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे समजते.

ग्रामस्थांनी विकासकामांमध्ये कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा देत जनतेच्या कराच्या पैशातून होणारी कामे दर्जेदार आणि नियोजनबद्ध व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच चुकीच्या पद्धतीने उभारण्यात आलेले विद्युत पोल त्वरित स्थलांतरित करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या संयुक्त पाहणीनंतर प्रशासन नेमकी कोणती कार्यवाही करते, याकडे आता वडगाव निंबाळकर व कोऱ्हाळे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भारत–जपान तंत्रज्ञान सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बैठक

**पुणे (दै. संध्या) :**

जपानमधील आयएम कार्पोरेशन चे अध्यक्ष रेन्या किकुची आणि वरिष्ठ सल्लागार ताकाशी इतामिया यांनी फिडेल सॉफ्टटेक चे संस्थापक-अध्यक्ष सुनील कुलकर्णी तसेच व्यवस्थापकीय संचालक प्राची कुलकर्णी यांच्यासमवेत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीस माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी समन्वयक आणि प्रेरक म्हणून मार्गदर्शन केले.

बैठकीदरम्यान भारत–जपान तंत्रज्ञान सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल अभियांत्रिकी, संशोधन व विकास, नवसंकल्पना, तंत्रज्ञानाधारित गुंतवणूक आणि उच्च-कौशल्याधारित रोजगारनिर्मिती या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यानंतर शिष्टमंडळाने महापौर मंजूषा नागपुरे यांच्या



कार्यालयास सदिच्छा भेट दिली आणि अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली. या भेटीत शहर विकास, तंत्रज्ञान सहकार्य, गुंतवणूक, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मिती यांसह विविध विषयांवर सकारात्मक संवाद झाला.

यावेळी फिडेलसॉफ्ट टेक जपानने भारतातील विस्तारासाठी पुणे शहराची निवड केल्याची माहिती देण्यात आली. प्रस्तावित विस्तार प्रकल्पांतर्गत पुढील पाच वर्षांत एक हजारांहून अधिक उच्च-कौशल्याधारित माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारनिर्मिती होणार असल्याचे सांगण्यात आले.

महापौर मंजूषा नागपुरे यांच्या सोबत झालेल्या चर्चेदरम्यान पुणे शहराला भारत–जपान तंत्रज्ञान सहकार्याचे महत्त्वपूर्ण केंद्र बनविण्यासाठी आवश्यक सहकार्य आणि सकारात्मक वातावरण उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली. या प्रकल्पामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, सॉफ्टवेअर विकास, डिजिटल अभियांत्रिकी तसेच संशोधन-विकास क्षेत्रांना मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः जपानी भाषा अवगत असलेल्या तरुणांसाठी जागतिक दर्जाच्या करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होणार असल्याचेही नमूद करण्यात आले. हा उपक्रम भारत आणि जपान यांच्यातील औद्योगिक व तंत्रज्ञान सहकार्य अधिक बळकट करणारा ठरणार असून, भारताचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी आणि

जपानच्या पंतप्रधान सनाये ताकाइची यांनी मांडलेल्या सहकार्याच्या व्यापक दृष्टीकोनाला अधिक गती देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पुणे शहर आता भारत–जपान तंत्रज्ञान सहकार्याचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येत असून, भविष्यातील कौशल्याधारित अर्थव्यवस्थेसाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### "स्व.अजितदादा पवार यांच्या नावाने जिल्हा परिषद स्तरावर योजना सुरु करावी"

सुपे (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा परिषदेमार्फत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नावाने कृषी किंवा शैक्षणिक विभागामध्ये नवीन योजना सुरू करून तिचे नामकरण त्यांच्या नावाने करण्यात यावे,अशी आग्रही मागणी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे सुपे परगणा प्रमुख सुनील राजे भोसले यांनी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.सुनील राजे भोसले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,पाच महिन्यांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे निधन झाले.कामाचा माणूस, तळागाळातील नेता आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनामुळे राज्याच्या राजकारणात आणि जनसामान्यांच्या मनात मोठी पोकळी निर्माण झाली असून ती आजही भरून निघालेली नाही.येत्या २२ जुलै रोजी स्व. अजितदादा पवार यांची प्रथम जयंती साजरी होणार आहे.त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव कायम स्मरणात राहावा,यासाठी जिल्हा परिषदेमार्फत कृषी किंवा शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित एखादी नवीन योजना सुरू करून त्या योजनेला स्व.अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.अजितदादा पवार यांनी शेती, शिक्षण,पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकासासाठी केलेले कार्य लक्षात घेता,त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग ठरेल,असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याबाबतची सकारात्मक दखल घेऊन संबंधित विभागांकडे शिफारस करण्यात यावी,अशी विनंतीही सुनील राजे भोसले यांनी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्याकडे केली आहे.



### पाले गाव जलमय; पुराच्या पाण्यामुळे तरुणाई करत आहे पाण्यातून जलविहार

उरण (दैनिक संध्या) :उरण तालुक्यातील पाले गावात आज शनिवारी (दि.४) सकाळपासून वाढलेल्या पावसाच्या जोरामुळे पाले गावातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले असून, या पुराच्या पाण्याचा फटका मुख्य रस्त्यावर असलेल्या साकाव पुलाच्या कामाचे रुंदीकरण न केल्यामुळे बसला असल्याचे नागरिकांकडून स्पष्ट बोलले जात आहे. संबंधित प्रशासन व ठेकेदार याला जबाबदार आहेत. प्रशासनाच्या व ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पुराच्या पाण्याचे संकट ओढावले असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान गावातील तरुणाईने पुराच्या पाण्यामुळे नदीचे स्वरूप प्राप्त झालेल्या पाण्यात होडी चालवून मनसोक्त जलविहाराचा आनंद घेतला. मात्र येथील नागरिकांच्या घरातील चीज वस्तूंचे व संसार उपयोगी सामानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती माजी सरपंच वैभवी नंदकुमार म्हात्रे यांनी दिली. या गावावरून कोप्रोली ते आवरे असा नागरिकांच्या रहदारीचा मुख्य मार्ग गेला आहे. या मार्गाचे काम येथील स्थानिक ठेकेदारांनी केले आहे. मात्र या रस्त्यावरील पाणी जाण्याचा साकाव पुल हा अरुंद असल्यामुळे येथील डोंगर माथ्यावरून पावसाळ्यात येणाऱ्या नैसर्गिक झऱ्याच्या पाण्याचा या अरुंद साकावा मधून व्यवस्थितरित्या निचरा होत नसल्यामुळे, परिसरातील सखल भागात पाणी तुंबून हे पुराचे पाणी गावातील नागरिकांच्या घरामध्ये घुसले आहे. संबंधित मुख्य रस्त्यावर असलेला साकाव पूल मोठ्या आकाराचा बांधण्यात यावा अशी मागणी माजी सरपंच वैभवी म्हात्रे यांच्यासह गावकऱ्यांनी उरणच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे केली होती. याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे नरेश पवार यांना लेखी निवेदन दिले होते. मात्र अपेक्षित असलेल्या या साकाव पुलाचे बांधकाम मोठ्या आकाराचे न केल्यामुळे पाणी तुंबून सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे. नागरिकांना बाहेर पडणे अवघड झाले आहे.

# एफआरएनडी प्लॅटफॉर्म मुळे इलक्कियाला मिळाला आशा, प्रेम आणि आत्मनिर्भर होण्याचा मार्ग

**मुंबई (दै. संध्या) :**

२८ वर्षांच्या इलक्कियाच्या आयुष्याची सुरुवातच एका मोठ्या आघाताने झाली होती. जन्मतःच आईचे छत्र हरवल्यामुळे तिच्या वडिलांनीच तिचे विश्व व्यापले होते, तेच तिचे सर्वस्व आणि आधारस्तंभ होते. मात्र, कोव्हिड-१९ च्या महाभयंकर लाटेने तिचा हा एकमेव आधारही हिरावून घेतला आणि इलक्किया पूर्णपणे एकाकी झाली. जवळच्या व्यक्तींना गमावल्यामुळे तिच्या मनात एक खोल भीती बसली होती, ज्यामुळे ती लोकांपासून, विशेषतः पुरुषांशी बोलताना कमालीची संकोचू लागली होती.

तिच्या या शांत आणि एकाकी आयुष्यात एफआरएनडी या ॲपच्या रूपाने एक आशेचा किरण चमकला. हे केवळ एक तंत्रज्ञान नसून, ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोकांसाठी बनवलेले एक सुरक्षित डिजिटल जग आहे. मराठीसह १४ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या या व्यासपीठामुळे इलक्कियाला स्वतःच्या भावना आपल्या भाषेत मांडण्याचे बळ मिळाले.

इलक्कियाची ही गोष्ट केवळ एका यशस्वी विवाहाची नाही, तर ती एका स्त्रीच्या पुनर्जन्माची आहे. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तिने केवळ जोडीदारच मिळवला नाही, तर आर्थिक स्वातंत्र्यही प्राप्त केले. या ॲपमधील कामातून मिळालेल्या उत्पन्नाच्या जोरावर तिने तिचे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केले. ज्या मुलीला कधीकाळी लोकांशी बोलताना शब्द फुटत नसत, ती आज एक व्यावसायिक वकील म्हणून न्यायालयात इतरांसाठी न्याय मागत आहे. एका सुरक्षित डिजिटल प्लॅटफॉर्मने दिलेल्या साथीमुळे इलक्कियाचे आयुष्य शून्यातून पुन्हा उभे राहिले, जे खऱ्या अर्थाने 'व्हॉइस टू व्हिक्टरी' (आवाजाकडून विजयाकडे) नेणारा प्रवास ठरला आहे.

# वर्धा येथील १०० खाटांच्या महिला व नवजात शिशू रुग्णालयाचा प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे उपस्थित

**मुंबई (दै. संध्या) :**

वर्धा जिल्ह्यातील १०० खाटांच्या महिला व नवजात शिशू रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न आज महाराष्ट्र विधान परिषदेत लक्षवेधीद्वारे आ. संजय भेंडे यांनी प्रभावीपणे उपस्थित केला. जून २०२३ मध्ये या रुग्णालयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र, आवश्यक फर्निचर, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, नवजात शिशूंसाठी NICU सुविधा, तसेच डॉक्टर, परिचारिका व इतर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे हे रुग्णालय अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील माता व नवजात



शिशूंना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यात मोठ्या अडचणी येत असल्याचा मुद्दा आ. भेंडे यांनी सभागृहात ठामपणे मांडला.

यावेळी ₹१८.६४ कोटींच्या प्रलंबित प्रस्तावास तात्काळ मंजुरी देणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे व फर्निचर उपलब्ध करणे, रिक्त पदे भरणे, रुग्णालयासाठी सुरक्षा व्यवस्था करणे तसेच रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली.

यावर उत्तर देताना आरोग्य मंत्री यांनी हा विषय अत्यंत सकारात्मकपणे स्वीकारला. प्रलंबित बाबींची तातडीने पूर्तता करून आवश्यक निधी, उपकरणे व मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी शासन आवश्यक कार्यवाही करेल तसेच रुग्णालय लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सभागृहात आश्वासन दिले. यावेळी आ. संजय भेंडे यांनी आरोग्य मंत्री यांचे आभार व्यक्त करत, शासनाने दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# येरवडा खुले कारागृहात गाई भेट व सार्थ ज्ञानेश्वरी वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम

**पुणे (दै. संध्या) :**

दि. 5.7.2026 रोजी महाराष्ट्र कारागृह विभागाच्या "सुधारणा व पुनर्वसन" या उद्दिष्टाला बळ देण्यासाठी येरवडा खुले कारागृह, येरवडा, पुणे येथे गाई दान कार्यक्रम तसेच आषाढी वारीनिमित्त बंदीजनांना ५० सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथांचे वाटप असा दुहेरी सामाजिक व आध्यात्मिक उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

हा कार्यक्रम डॉ. श्री सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, श्री योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य तसेच श्री सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे यांच्या मार्गदर्शन व आदेशानुसार आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास प्रसिद्ध वास्तुतज्ञ श्री आनंद पिंपळकर (आनंदी वास्तू) व श्री गुरुजी श्रीनंद पिंपळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून डॉ. श्री नीलू शेलार, श्री बोरमलनाथ गोशाळा ट्रस्ट, पुणे तसेच श्री आनंद साळुंके



व सौ. भाग्यश्री साळुंके, आर. के. फाऊंडेशन, पुणे यांच्या सहयोगाने देशी खिलार जातीच्या 6 गायी व 1 बैल येरवडा खुले कारागृहास भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे बंदीजनांच्या सुधारणा व पुनर्वसनास चालना मिळण्याबरोबरच शेतीपूरक जोड व्यवसाय म्हणून गोपालनाला प्रोत्साहन मिळणार असून स्वावलंबनाचा मार्ग अधिक सक्षम होणार आहे.

याच कार्यक्रमात सुप्रसिद्ध लेखक श्री लक्ष्मण सूर्यभान घुगे यांनी बंदीजनांना 50 सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देऊन आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे संवर्धन करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमास श्री आनंद पिंपळकर, श्रीनंद पिंपळकर, सुप्रसिद्ध लेखक श्री लक्ष्मण घुगे, श्री आनंद साळुंके, सौ. भाग्यश्री साळुंके, श्री प्रणव साळुंके, डॉ. नीलू शेलार, रोटरी ईस्टच्या अध्यक्षा सौ. अलका ओसवाल उपस्थित होत्या. तसेच येरवडा खुले कारागृहाच्या वतीने अधीक्षक श्री शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी श्री नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी श्री नागनाथ भानवसे, सौ. निशा श्रेयकर, सुभेदार श्री चंद्रकांत खांदवे, श्री सुनील गायकवाड, हवालदार श्री राजेंद्र धनगर, श्री दत्तात्रय मोडक, श्री प्रकाश भोसले, शिपाई श्री राकेश पवार, श्री महेश हळदकर, श्री याकूब शेख, श्री महेंद्र लोहकरे, अशोक होले, मोहसीन जमादार, मीना पोटकुले, सरला साबळे, मोनिका लांडगे, संध्या जाधवर, संतोषी हिंगे, ऐश्वर्या तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने बंदीजन उपस्थित होते.

# मुंबईच्या रस्त्यावरील मॅनहोल्स वर आलेखन करून जाळ्या बसवाव्यात - नगरसेवक अंकित प्रभू

**मुंबई (दै. संध्या) :**

मुंबईतील सिमेंट कॉंक्रीट टप्पा १ व २ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांवरील मॅनहोल्सवर आलेखन करून जाळ्या बसवाव्यात त्याचप्रमाणे नविन तंत्रज्ञान वापरुन मॅनहोल्सचा माहितीसंच उपलब्ध होईल अशी सुविधा करावी अशी सूचना प्रभाग क्रमांक 54 चे शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक अंकित सुनील प्रभू यांनी महापालिका आयुक्तांना पत्राद्वारे केली आहे

मुंबईत शहर व उपनगरांत एकूण १०३९२६ मॅनहोल्स आहेत. यापैकी कितीतरी मॅनहोल्स वर सरंक्षक जाळ्या बसवल्या गेल्या नाहीत अश्या रस्त्यावरून चालताना नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. दोन जुलै रोजी दुर्दैवी घटनेची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असून, नागरिकांच्या सुरक्षेबाबत आता ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे प्रभाग क्रमांक 54 चे शिवसेनेचे उद्धव ठाकरे गटाचे नगरसेवक आणखी सुनील प्रभू



यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात सांगितले आहे. मुंबई शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे रस्ते बनवले जात आहेत. मात्र, या रस्त्यांवर असणाऱ्या मॅनहोल्सवर संरक्षक जाळ्या बसविल्या गेल्या नाहीत त्याचबरोबर सदर मॅनहोल्सचा आलेखन किंवा माहितीसंच तेथील संबंधित अधिका-यांना उपलब्ध झालेला नाही त्यामुळे असा गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे उद्धव शिवसेना नगरसेवक अंकित सुनील प्रभू यांनी पत्रात म्हटले आहे. कॉंक्रीट रस्त्यांवर पावसाळ्यापूर्वी आणि नियमित साफसफाई करतेवेळी झाकणे उघडली जातात, परंतु काम झाल्यानंतर ती बऱ्याचदा जागेवरून गायब असतात किंवा उघडीच ठेवली जातात, ब-याच मॅनहोल्सवर बसविलेल्या जाळ्या तुटलेल्या अवस्थेत असतात किंवा तिथून चोरीला गेलेल्या असतात. असे उद्धव ठाकरे गट शिवसेना नगरसेवक अंकित प्रभू यांनी आपल्या पत्रात नमूद केले असून त्यांनी पुढे म्हटले आहे की अशा उघड्या मॅनहोल्समध्ये पडून निष्पाप नागरिकांचा मृत्यू होणे ही अत्यंत संतापजनक बाब आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर, मुंबईतील सर्व मॅनहोल्स सुरक्षित करणे तसेच त्यावर आलेखन करून जाळ्या बसवणे त्याचबरोबर तेथील मॅनहोल्सचा माहितीसंच उपलब्ध होईल अशी सुविधा करणे गरजेचे असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक अंकित प्रभू यांनी म्हटले आहे की . या उघड्या गटारांवर संरक्षक जाळ्या बसवण्याचे काम ३१ मे पूर्वी पूर्ण करणे प्रशासनाला बंधनकारक होते. असे असतानाही जुलै महिना उजाडला तरी अनेक ठिकाणी जाळ्या बसवण्याचे काम अपूर्ण का आहेत, याचे स्पष्टीकरण मिळणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे आज मुंबईकर त्रस्त असल्याचे शिवसेना उद्धव ठाकरे गट नगरसेवक अंकित प्रभू यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे

३१ मे ची डेडलाईन उलटूनही कामे अपूर्ण ठेवणाऱ्या आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. अशी मागणी नगरसेवक अंकित सुनील प्रभू यांनी महापालिका आयुक्ताना पत्राद्वारे सुचविले आहे.

# मुसळधार पावसामुळे उरण व द्रोणागिरी रेल्वे स्टेशन जलमय

**उरण (दै. संध्या) :**

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून उरण तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मात्र, उरण व द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात साचलेल्या पाण्यामुळे रेल्वे प्रशासनाच्या बेजबाबदारपणा, निष्काळजीपणा आणि ढिसाळ नियोजनाचे पुन्हा एकदा दर्शन घडल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. स्टेशन परिसरातील जिने, पायऱ्या आणि प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने रेल्वे प्रशासनाचा कारभार केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

उरण परिसरात रेड अलर्ट असतानाही स्टेशन परिसरात पाणी साचण्याची समस्या कायम राहिल्याने प्रशासनाच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे. प्रत्येक पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असताना कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात रेल्वे प्रशासनाला अपयश आले असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेशी सर्रास खेळ केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, हजारो प्रवासी दररोज या मार्गावरून प्रवास करत असताना त्यांच्या जीविताची कोणतीही पर्वा नसल्याचे चित्र दिसत आहे. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना पाण्यातून मार्ग काढत रेल्वेत चढावे लागत असून, एखादा अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

स्थानिक नागरिकांनी रेल्वे प्रशासनाला तातडीने जागे होण्याचे आवाहन करत स्टेशन परिसरातील पाणी निचऱ्याची सक्षम व्यवस्था करावी, दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत आर्थिक गोंधळ

## कोट्यवधींच्या उधळपट्टीवर गंभीर प्रश्नचिन्ह; महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस

पिंपरी (दै. संध्या)



श्रीमंत नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या डबघाईस आली आहे. असे असतानाही महापालिका प्रशासनासह सत्ताधारी कारभाऱ्यांकडून प्रशासकीय राजवटीप्रमाणेच उधळपट्टीचा सिलसिला कायम आहे. त्यामुळे महापालिकेचा आर्थिक डोलारा टिकून राहणार का, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

प्रशासकीय काळात तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी अनेक अनावश्यक आणि मोठ्या खर्चिक कामांना मान्यता दिली आहे. त्यामुळे महापालिकेवर तब्बल 4 हजार 500 कोटी रुपयांचे देणी (दायित्व) निर्माण झाले आहे. निधी तसेच, अर्थसंकल्पात तरतूद नसल्याचे कारण पुढे करून अधिकारी नगरसेवकांना नवीन कामे करण्यास नकार देत आहेत. त्यामुळे आपल्या प्रभागात काम करता येत नसल्याने नगरसेवक संताप व्यक्त करत आहेत. त्यात बोगस 14 उपसूचनांद्वारे सन 2025-26 च्या अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये वाढ किंवा घट करत तब्बल 60 कोटी 18 लाख रुपयांची बिले मर्जीतील ठेकेदारांना अदा केल्याचे आर्थिक घोटाळा प्रकरण चांगले गाजले. त्याप्रकरणी अद्याप फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. आयुक्तांनी त्या घोटाळ्याचा चौकशी अहवाल राज्याच्या वित्त विभागाकडे सादर करून हात झटकले आहेत. त्यावरुन ते प्रकरण दाबल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. प्रशासकीय राजवटीत तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून खर्चाचा सपाटा मुक्तहस्ते केला गेला. त्यामुळे महापालिका डबघाईस आलेली असतानाही सत्ताधारी कारभाऱ्यांकडून काटकसर व बचतीचे धोरण न स्वीकारता प्रशासकीय काळातील खर्चाच्या उधळपट्टीचे सत्र कायम ठेवण्यात आले आहे. सत्तारूढ पक्षनेते, महापौर यांच्या दालनानंतर आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांच्या दालनांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. तसेच, एक हजार 127 नव्या खुर्च्या खरेदी करण्यात आला. एका खुर्चीची किमत 8 हजार 525 रुपये असून, त्यावर एक कोटीपेक्षा अधिकचा खर्च झाला आहे. नवीन वाहने असताना महापौर व आयुक्तांसाठी अलिशान वाहन घेण्यात आले आहे. महापौरांसाठी 30 लाखांची आणि आयुक्तांसाठी 19 लाखांचे वाहन खरेदी करण्यात आले. विविध विषय समिती सभापती तसेच, क्षेत्रीय समिती अध्यक्षांनाही नवीन वाहने खरेदी केली जाणार आहेत.

गरज नसताना प्रभागांची फोडाफोडी करत आठऐवजी दहा क्षेत्रीय कार्यालयाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे दोन नव्या कार्यालय निर्मितीवर मोठा खर्च झाला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा तसेच, राज्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महापालिका प्रशासन तसेच, सत्ताधारी कारभाऱ्यांकडून अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. उत्पन्नाचे नवनवीन स्त्रोत निर्माण करण्याकडे डोळाझाक केली जात आहे. अनावश्यक कामासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याने आर्थिक स्थिती भक्कम होण्याऐवजी अधिक कमकुवत होण्याचा धोका वाढला आहे.

राज्य शासनाने महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम घेण्यास मनाई केली आहे. असे असताना प्रबोधनपर्वाच्या नावाने मोठी उधळपट्टी केली जात आहे. सांस्कृतिक, गीतगायन, मनोरंजनात्मक कार्यक्रमांसोबत महानाट्याचे आयोजन करून एका प्रबोधन पर्वावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. प्रबोधनपर्व आयोजनासाठी महापुरुषांच्या नावांचा नव्याने समावेश करण्याचे प्रमाण वाढतच चालले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सध्या एकूण 5 हजार 768 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. राष्ट्रीयीकृत बँकेऐवजी मर्जीतील खासगी बँकेत गुंतवणूक, गुंतवणुकीस विलंब आदी कारणांमुळे ठेवी कमी झाल्या आहेत.

तो मुद्दा महापालिका निवडणुकीत खूपच गाजला होता. सध्या असलेल्या एकूण ठेवीपैकी राखीव ठेवी 4 हजार 218 रुपयांच्या आहेत. तर, सर्वसाधारण ठेवी 1 हजार 550 रुपयांच्या आहेत. त्यापैकी 550 कोटी रुपयांच्या ठेवी पवना बंद जलवाहिनी प्रकल्पासाठी मोडण्यात येणार आहेत, असे स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी जाहीर केले आहे.

### सल्लागार नेमण्याची परंपरा कायम


महापालिकेत छोट्या व मोठ्या अशा सर्वच कामांसाठी सल्लागार नेमण्याची जुनी परंपरा आहे. तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या कार्यकाळापासून सल्लागार नेमण्याच्या पद्धतीस सुगीचे दिवस आले. त्यासाठी सीटीओ हे स्वतंत्र कार्यालय महापालिकेत स्थापन करण्यात आले. त्यांच्यासह असंख्य सल्लागार एजन्सी स्थापत्य, पाणीपुरवठा, उद्यान, पर्यावरण, ड्रेनेज, क्रीडा, शहरी दळणवळण आदी विभागात नेमण्यात आले आहेत. त्याशिवाय संबंधित विभागाचे पान हलत नसल्याने त्यांच्यावर दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चिखली-मोशी भागाला दिलासा; 22 केव्ही नवीन स्विचिंग सबस्टेशनला मंजुरी

मोशी (दैनिक संध्या) : चिखली परिसरामध्ये मागील काही दिवसांपासून वीजपुरवठा खंडित होण्याची समस्येत वाढ झाली असून, नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र, आता चिखलीकरांची यामधून लवकरच सुटका होणार असून, येथील वीज यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल महावितरणतर्फे उचलण्यात आले आहे. 'टाउन डीपीआर'अंतर्गत चिखली येथे २२ केव्ही क्षमतेच्या नव्या 'स्विचिंग सबस्टेशन'ला मंजुरी मिळाली असून, यामुळे परिसरातील विजेचा ताण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. सध्या या प्रकल्पाची निविदाप्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, मुख्य कार्यालय स्तरावर 'कमर्शियल बीड' होणार आहे. या निविदेमध्ये पात्र ठरलेल्या संस्थेला पुढील काही दिवसांत 'लेटर ऑफ अवॉर्ड' मिळून कामाची मंजुरी प्राप्त होईल. या संपूर्ण प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात ऑक्टोबर महिन्यानंतर सुरू होणार असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येत आहे. कारण पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून सध्या खोदकामाची परवानगी दिली जात नाही. ऑक्टोबर महिन्यापर्यंत महापालिकेची आवश्यक ती खोदकाम व केबल टाकण्याची परवानगी घेण्याचे प्रशासकीय काम पूर्ण केले जाईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती दिली जाईल.





### कासारवाडी जवळ एसटी बस आणि कारचा अपघात

पिंपरी (दैनिक संध्या) : कासारवाडी जवळील कुंदननगर येथे आज सकाळी एसटी बस आणि चारचाकी कार यांच्यामध्ये अपघात झाला. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एसटी बस व कार यांची धडक झाली. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून, जखमींबाबत अधिकृत माहिती मिळणे बाकी आहे. या अपघातानंतर याठिकाणी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेतले. पोलिसांकडून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.



### पिंपरी-चिंचवड पोलिसांना ह्युंदाई मोटर फाउंडेशनकडून 300 वाहतूक बॅरिकेड्सची भेट

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि सुरक्षित करण्याच्या उद्देशाने ह्युंदाई मोटर इंडिया फाउंडेशन (HMIF) यांच्या वतीने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाला ३०० एमएस ए-टाईप (ट्रॅफिक) बॅरिकेड्स भेट देण्यात आले आहेत. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या संकल्पनेतून आणि ह्युंदाई मोटर इंडिया फाउंडेशनच्या इंडिया रोड सेफ्टी उपक्रमांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक नियंत्रण आणि रस्ते सुरक्षेची गरज लक्षात घेऊन ही मदत करण्यात आली आहे. हे बॅरिकेड्स शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील ठिकाणे, विशेष वाहतूक नियोजन क्षेत्रे तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी वापरण्यात येणार आहेत. यामुळे वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होऊन अपघातांची शक्यता कमी करण्यास मदत होणार असल्याचे पोलिस प्रशासनाने सांगितले. या कार्यक्रमाला पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलिस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) संग्राम आवाड, अपर पोलिस आयुक्त (प्रशासन) दत्तात्रय तेली, पोलिस उपायुक्त (वाहतूक) विशाल गायकवाड तसेच ह्युंदाई मोटर इंडिया फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील रस्ते सुरक्षा बळकट करण्यासाठी पोलिस प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### किरकोळ वादातून तरुणाचा हातोड्याने ठेचून खून; आरोपी अटकेत

पिंपरी (दैनिक संध्या) : किरकोळ भांडणाच्या रागातून एका तरुणाचा हातोड्याने डोक्यात वार करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना चऱ्होली खुर्द परिसरात घडली आहे. या प्रकरणी आळंदी पोलिसांनी आरोपीला अटक केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जुलै रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घोलप वस्ती, काकडे सिटी, चऱ्होली खुर्द (ता. खेड) येथे ही घटना घडली. याप्रकरणी कंत्राटदार चंद्रकांत पंढरीनाथ भाळे (वय ४३, देहू फाटा) यांनी फिर्याद दिली आहे. मृत व्यक्तीची ओळख करवीरसिंग उर्फ करवीरसिंग नथुसिंग लोधी (रा. छापरी ठाकूर, जिल्हा दमोह, मध्य प्रदेश) अशी असून, आरोपी साहिल रामदास दाभाडे (वय २९, रा. घोलप वस्ती, काकडे सिटी, चऱ्होली खुर्द) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी आरोपीने संतापाच्या भरात हातोड्याने डोक्यावर वार केल्याने संबंधित तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ हे करीत आहेत.

## ४८ तासांपासून रावेत-किवळे परिसर अंधारात; नगरसेविका ऐश्वर्या तरस यांचे MSEB कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

रावेत (दै. संध्या)



रावेत, किवळे, विकासनगर परिसरात गेल्या ४८ तासांपासून वीजपुरवठा खंडित असल्याने हजारो नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या तरस आणि मावळ लोकसभा युवा सेनेचे अध्यक्ष राजेंद्र तरस यांनी रावेत येथील महावितरण (एमएसईबी) कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.


रावेत विकासनगर, किवळे, मुकाई चौक, चंद्रभागा कॉर्नर, संकेश्वर विला, आकाशराज, बीआरटी रोडलगतच्या सर्व सोसायट्या, पेंडसे कॉलनी, टी.सी. कॉलनी आदी भागांमध्ये वीजपुरवठा बंद असल्याने सुमारे पाच ते सहा हजार कुटुंबे प्रभावित झाली आहेत. वीज नसल्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत ऐश्वर्या तरस व राजेंद्र तरस यांनी महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाचा निषेध केला. "जोपर्यंत जबाबदार अधिकारी स्वतः येऊन परिस्थितीची जबाबदारी स्वीकारत नाहीत, ठोस आश्वासन देत नाहीत आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्याबाबत स्पष्ट भूमिका मांडत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील," अशी भूमिका त्यांनी घेतली.

"ही केवळ वीजपुरवठ्याची समस्या नसून हजारो नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा आणि सन्मानाचा प्रश्न आहे. प्रशासनाने तातडीने जागे होऊन वीजपुरवठा सुरळीत करावा आणि नागरिकांना न्याय द्यावा," अशी मागणी ऐश्वर्या तरस यांनी केली. दरम्यान, परिसरातील नागरिकांमध्ये महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी असून, वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## शहरात दोन दिवसांत २७ झाडे पडण्याच्या घटना

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत पावसामुळे ३ जुलै रोजी १२ तर ४ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत १५ अशा एकूण २७ झाड पडण्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनांची माहिती प्राप्त होताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने संबंधित ठिकाणी तात्काळ धाव घेऊन झाडे व फांद्या हटविण्याची कार्यवाही केली. तसेच वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी रस्ते त्वरित मोकळे करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

३ जुलै रोजी चापेकर चौक (चिंचवडगाव), इंद्रायणी नगर (भोसरी), मोरवाडी कोर्ट (पिंपरी), सेक्टर २२ (निगडी), अशोक हॉटेल (फुगेवाडी), भारती हॉस्पिटल (काळेवाडी), यमुनानगर (निगडी), मोरवाडी कोर्ट (पिंपरी), सेक्टर २२ (निगडी), अशोका हॉटेल (फुगेवाडी), पूर्णानगर (प्राधिकरण), कोकणे चौक (पिंपळे सौदागर) परिसरातील विविध ठिकाणी झाड पडण्याच्या घटना घडल्या.

तसेच ४ जुलै रोजी निगडी पोलीस स्टेशन (निगडी), कुणाल आयकॉन रोड (पिंपळे सौदागर), त्रिवेणी नगर (निगडी), स्वामी समर्थ मंदिर (किवळे गावठाण), गुळवे वस्ती (भोसरी), इंद्रायणी नगर (भोसरी), खराळवाडी (पिंपरी) (मोशी), चक्रपाणी वसाहत (भोसरी), आरटीओ ऑफिस (मोशी), शास्त्रीनगर (कासारवाडी), टिळक हॉटेल (दापोडी), नाशिक फाटा (कासारवाडी), खंडोबा माळ (आकुर्डी) आणि केशवनगर (पचिंचवड) परिसरात झाड पडल्याच्या घटना नोंदविण्यात आल्या.

अशा विविध ठिकाणी ३ आणि ४ जुलै रोजी एकूण २७ झाडपडीच्या घटना घडल्या आहेत. तरी नागरिकांनी पावसाळ्यात मोठ्या झाडांच्या परिसरात आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीत महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## मावळातून २१ दिंड्यांचा पंढरीकडे प्रवास; वारीसाठी हजारो वारकऱ्यांची जय्यत तयारी

पिंपरी (दै. संध्या)

वडगाव मावळ: 'जाय जाय तू पंढरी होय होय वारकरी' या न्यायाने श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी वारीची आस लागलेल्या मावळ तालुक्यातील वारकऱ्यांची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. पंढरीच्या वाटेकडे पाऊले टाकण्यासाठी सर्व वारकऱ्यांचे लक्ष लागले असून, विठुनामाच्या जयघोषात मावळ तालुका न्हाऊन निघाला आहे.

श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी जाणाऱ्या जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान मंगळवारी (दि. ७), तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान बुधवारी (दि.८ जुलै) होत आहे. या पार्श्वभूमीवर मावळातील हजारो वारकरी तयारीला लागले आहेत. १८ ते १९ दिवसांच्या या पायी प्रवासासाठी वारकऱ्यांनी अंथरुण-पांघरुण, पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट दररोजच्या जेवणासाठी ताट-वाटीचे साहित्य, वारकरी पोशाख आणि पायवाटेने अखंड नामचिंतन घडण्यासाठी भजनी मालिका अशी सर्व जय्यत तयारी पूर्ण केली आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये बीआरटीएस मार्गावर निओ मेट्रो प्रस्ताव

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई बंगळुर महामार्गास जोडणाऱ्या बीआरटीएस मार्गावर (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रॉन्झिट सिस्टीम) इलेक्ट्रिक मेट्रो सुरू करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महामेट्रो तयार करणार आहे. बीआरटीएस मार्गास प्रवाश्यांचा प्रतिसाद नसल्याने निओ मेट्रोचा प्रस्ताव पुढे करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरीहून स्वारगेट अशी मेट्रो धावत आहे. पिंपरी ते निगडी या विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम वेगात सुरू आहे. तसेच, निगडी ते चाकण या नवीन मार्गाचा सुधारित डीपीआर तयार करण्यात आला आहे. मात्र, तो मंजुरीअभावी महापालिकेत धूळखात पडून आहे.

शहराचे नागरीकरण वेगाने वाढत असून, शहरातील नागरिकांना शहरांतर्गत प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक सुविधा महापालिकेने उपलब्ध करून देण्याचा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 11 एप्रिल 2025 ला मुंबईत बैठक झाली होती. त्या शहरातील नवीन मेट्रो मार्ग तयार करण्याबाबत चर्चा झाली होती. बीआरटीएस मार्गास प्रवाश्यांचा अल्प प्रतिसाद आहे. त्या मार्गावर इलेक्ट्रिक मेट्रो सुरू करण्याचा प्रस्ताव महामेट्रोने दिला होता.

## संविधान हे वकिलांची भगवद्गीता! - ॲड. सतिश गोरडे; एस. एस. पाटील विधी महाविद्यालयाचे उद्घाटन संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अतुलनीय योगदानातून निर्माण झालेले भारतीय संविधान हे वकिलांची भगवद्गीता आहे!' असे विचार पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे यांनी गणेशनगर, दापोडी येथे शनिवार, ०४ जुलै रोजी व्यक्त केले.

एस. एस. पी. शिक्षण संस्था संचलित एस. एस. पाटील विधी महाविद्यालयाच्या उद्घाटन समारोहात प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सतिश गोरडे बोलत होते. पुणे ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळुराम भुजबळ अध्यक्षस्थानी होते; तसेच एस. एस. पी. शिक्षण संस्थेचे चेअरमन एस. बी. पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुहास पडवळ, फॅमिली बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कल्पना निकम, प्राचार्या उज्ज्वला शिंदे, ॲड. वर्षा काळभोर, ॲड. बाजीराव दळवी, ॲड. अभिजित निकम, ॲड. प्रताप मोरे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, 'निरसे दूध हे निरामय, निर्भेळ दिसत असलेतरी ते नासू नये म्हणून त्याला तापवावे लागते. समाजाचेही दुधासारखेच असते. त्याच्यातील अस्वस्थता कमी करण्यासाठी विधिसंमत कायद्यांचे नियंत्रण आवश्यक असते. नव्याने सुरू होत असलेल्या एस. एस. पाटील विधी महाविद्यालयाच्या माध्यमातून विधी प्रशिक्षित विद्यार्थ्यांनी आपल्या विधिसेवेतून अन्याय, अत्याचारमुक्त आणि एकसंध समाज घडवावा, अशा शुभेच्छा मी देतो!' यावेळी दृष्टान्तकथा सांगून गोरडे यांनी आपले विचार प्रभावी शब्दांतून मांडले.

ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुहास पडवळ यांनी, 'एस. बी. पाटील हे एक चालतेबोलते विद्यापीठ असून पिंपरी - चिंचवड परिसरात त्यांनी खूप मोठे शैक्षणिक कार्य उभारले आहे!' असे गौरवोद्गार काढले. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविकातून, 'शिक्षण कमी असूनही वयाच्या बाराव्या वर्षापासून मी कामाला सुरुवात केली. अनेक अडीअडचणी आणि प्रतिकूल परिस्थितीतून या विधी महाविद्यालयाला मान्यता मिळविण्यात यश मिळाले आहे!' , अशी माहिती दिली. ॲड. काळुराम भुजबळ यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'विधी शिक्षण हे आजच्या काळात खूप महत्त्वाचे अन् गरजेचे आहे. एका विधी महाविद्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षपद मी भूषविले हा माझ्या जीवनातील एक संस्मरणीय क्षण आहे!' असे मत व्यक्त केले. ॲड. कल्पना निकम आणि प्राचार्या उज्ज्वला शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. सचिव प्रा. चंद्रशेखर पाटील, कोषाध्यक्ष गणेश पाटील, प्रा. सुनील शेवाळे, आकाश पाटील यांनी संयोजनात सहकार्य केले. प्रा. दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले. विधी महाविद्यालय प्राचार्या प्रा. सोनल देशमुख यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कदमवाकवस्ती येथील दुर्घटनाग्रस्त कुटुंबास सभापती युवराज काकडे यांची सांत्वनपर भेट

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : कदमवाकवस्ती येथे खड्ड्यात पडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या चिमुकल्या कु. सोहम लखन कसबे (वय २ वर्षे) यांच्या कुटुंबाची हवेली पंचायत समिती सभापती युवराज हिरामण काकडे यांनी भेट घेऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी सभापती युवराज काकडे यांनी, शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून, या दुःखद घटनेची माहिती दिली. तसेच मृत चिमुकल्याच्या कुटुंबाला, मुख्यमंत्री सहायता निधीतून विशेष बाब म्हणून आर्थिक मदत मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत विनंती केली. यावर आमदार कटके यांनी त्वरित प्रशासनाशी समन्वय साधून, आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या लेखी सूचना दिल्या. यानंतर सभापती युवराज काकडे व पंचायत समितीचे सदस्य अमोल टेकाळे यांनी घटनास्थळासह संपूर्ण ओढ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी, ओढ्यालगत संरक्षक भिंत, आवश्यक सुरक्षा व संबंधित उपाययोजना करणे तसेच संपूर्ण पालखीतळ परिसराचा नियोजनबद्ध आराखडा तयार करणेकामी, आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे यांची लवकरच भेट घेणार असल्याचे सांगितले. या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये व नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे तसेच येणाऱ्या वारकऱ्यांच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना, तातडीने राबविण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे मत सभापती युवराज काकडे यांनी व्यक्त केले. यावेळी स्थानिक ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

### दिवे घाटातील पुरंदरचा राजा : 65 फूट उंच भव्य विठुरायाचे दिव्य दर्शन!

कवठे येमाई (दैनिक संध्या) : पुणे-सासवड मार्गावरील दिवे घाटात झेंडेवाडी परिसरात उभारलेली ६५ फूट उंच विठ्ठलाची भव्य दिव्य मूर्ती वारकरी आणि भाविकांसाठी श्रद्धेचे प्रमुख केंद्र बनली आहे. या मूर्तीच्या



कपाळी सोन्याचा मुलामा दिलेला गंध असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील कठीण घाटमार्गावर वारकऱ्यांना विठुरायाचे दर्शन व्हावे, या उद्देशाने ही मूर्ती पुण्यातील उद्योजक विजयसा बाबुरावसा कोल्हापुरे यांनी २०१९ उभारण्याचे कार्य केले. तर पांडुरंगाची कृपा झाली तर या ठिकाणी लवकरच प्रति पंढरपूरची निर्मिती करण्याचा मानस असल्याचे कोल्हापुरे यांनी सांगितले.आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर नुकतीच या ६५ फूट उंचीच्या या भव्यदिव्य श्री विठ्ठलाच्या मूर्तीची मान्यवरांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करण्यात आली. तर या विठ्ठलाची पूजा होता च वरुणराजाने ही जोरदार उपस्थिती लावल्याचे झेंडेवाडी चे सरपंच अमर झेंडे यांनी सांगितले. तर मागील ७ वर्षांपासून दिवे घाटातील श्री विठ्ठलाची वारी पूर्वी विधिवत पूजा झाल्यानंतर वासाचे हमखास आगमन होत असल्याने वारकरी,भाविक भक्तांचे हे श्रद्धेय स्थान झाले असल्याचे ही झेंडे म्हणाले. दिवे घाटातील ही ६५ फूट उंचीची श्री विठ्ठलाची भव्य मूर्ती काळ्या पाषाणात साकारण्यात आली असून तिच्या मस्तकावरील गंध पंचधातूंचा आहे. त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे.पुण्याचे उद्योजक,प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक विजय कोल्हापुरे यांनी जून २०१९ मध्ये ही मूर्ती उभारली. प्रसिद्ध शिल्पकार सागर भावसार यांनी या अद्वितीय कलाकृतीला मूर्त स्वरूप दिले आहे.निसर्गरम्य दिवे घाट परिसरातील ही मूर्ती आज पुणे जिल्ह्याचे एक प्रमुख पर्यटनस्थळ आणि वारकरी संप्रदायाचे प्रेरणास्थान ठरली आहे.

### मांजरी खुर्द येथे मित्राचा खून करून फरार आरोपी वाघोली पोलिसांकडून अटक

मांजरी खुर्द (दैनिक संध्या) : मित्राचा खून करून पसार झालेल्या एकाला वाघोली पोलिसांनी अटक केली आहे. मांजरी खुर्द भागातील एका फार्महाऊस परिसरात ही घटना नुकतीच घडली होती. सूरज अमृत साव (वय ३५) असे अटक केलेल्याचे नाव आहे. शिवशंकर सिंह असे खून झालेल्याचे नाव आहे. सूरज आणि शिवशंकर हे बांधकाम मजूर आहेत. मांजरी-कोलवडी रस्त्यावरील एका फार्महाऊसमधील खोलीत १ जुलैला सूरज आणि शिवशंकर यांच्यात वाद झाला. वादातून सूरजने शिवशंकरला पाईपने मारहाण केली. गंभीर जखमी शिवशंकरचा. उपचारादरम्यान मृत्यू झाला. मित्राचा खून करून सूरज पसार झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सूरज हा सातारा परिसरात असल्याची माहिती पोलीस कर्मचारी प्रदीप मोटे, सुनील कुसाळकर, दीपक कोकरे यांना मिळाली. त्यानंतर सूरजला सातारामधील एका नियोजित गृहप्रकल्प परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने मित्राचा खून केल्याची कबुली दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, सहायक निरीक्षक विनायक अहिरे, शहादेव हवाले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### पावसाचा कहर; राजगुरुनगरमध्ये संरक्षण भिंत कोसळली

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : खेड तालुक्यात दिवसभर झालेल्या मुसळधार पावसाने अनेक भागांना फटका बसला असून राजगुरुनगर येथे सिद्धिविनायक व्यापारी संकुलाची संरक्षण भिंत अचानक कोसळल्याची घटना घडली. भिंत कोसळतानाचा थरारक क्षण परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सततच्या जोरदार पावसामुळे संरक्षण भिंतीच्या पायाभागातील माती सैल झाली. पावसाचा जोर वाढताच भिंतीचा मोठा भाग अचानक कोसळला. या घटनेनंतर व्यापारी संकुल परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. भिंत कोसळल्यामुळे संकुलातील काही दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरले. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या मालाचे आणि दुकानांतील साहित्याचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. नुकसानाचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. घटना घडली त्या वेळी भिंतीजवळ कोणीही नसल्याने मोठा अनर्थ टळला. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, पावसाळ्यात जुन्या व कमकुवत संरचनांची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक व्यापारी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चाकण नगरपरिषद हद्दीत सकल पुन:निरीक्षण मतदार नोंदणीस प्रारंभ

## प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्टला प्रकाशित होणार

**चाकण (दै. संध्या)**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रांत तसेच मुख्य मतदार नोंदणी अधिकारी अनिल दौंडे यांच्या नियंत्रणाखाली चाकण नगरपरिषद हद्दीमध्ये सखोल पुनःनिरीक्षण मतदार नोंदणीस प्रारंभ झाला आहे. प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्टला प्रकाशित होणार आहे.

लोकशाही बळकटीकरणासाठी आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने चांगलीच कंबर कसली आहे. नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी केले आहे. या मोहिमेसाठी सुनील गोरडे यांची कर अधिकारी पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत चाकण शहरातील २६ मतदार केंद्रावरील सर्व बीएलओ पुढील महिनाभर प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन गणना प्रपत्रकांचे वाटप करणार आहेत. मतदारांकडून फॉर्म भरून घेणार आहेत. मतदार यादीतील त्रुटी दूर करून प्रत्येक पात्र नागरिकांचे नाव अचूकपणे नोंदविण्यासाठी घराघरात जाऊन मतदारांची माहिती पडताळली जाणार आहे.

> "चाकण नगरपरिषद हद्दीतील सुजाण व नवविवाहित, तरुणांनी मतदार यादीत आपले नाव असल्याची खात्री करावी. नाव नसल्यास किंवा बदल करावयाचा असल्यास त्वरित आवश्यक फॉर्म भरून प्रशासनाला सहकार्य करावे. आपल्या एका मतामुळे लोकशाही बळकट होते, त्यामुळे या मोहिमेत सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे."
> - डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद

प्रशासनाने नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह या मोहिमाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मतदार यादी अधिक अचूक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी आवश्यक अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, गणना प्रपत्र, साहित्य वितरण आदी पूर्वतयारी पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष घर टू घर भेटी सुरू झाल्या आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रासाठी राजकीय पक्षांच्या बीएलए - २ प्रतिनिधींची नियुक्ती करण्याबाबत संबंधित राजकीय पक्षांना सूचना देण्यात आल्या आहेत. सदरील फॉर्म भरताना मतदारांनी सन २००२ मध्ये झालेल्या सखोल पुन:निरीक्षण मतदार यादीतील माहिती भरावयाची असून, सदरील माहिती उपलब्ध नसल्यास भारत निवडणूक आयोगाने सांगितलेल्या बारा दस्तऐवजांपैकी कोणतेही दस्तऐवज किंवा पुरावे सदरील फॉर्म बरोबर जोडून बीएलओ यांच्याकडे सादर करावयाचे आहेत.

सदरील फॉर्म दोन प्रतीत असून, एक प्रत मतदारांकडे राहील व एक प्रत बीएलओ यांच्याकडे जमा करावी लागणार आहे. सदरील बीएलओ प्रत्येक मतदाराच्या घरी तीन वेळेस जातील. परंतु तिनही वेळेस सदरील मतदार यादीतील पत्यावर उपलब्ध नसल्यास किंवा गैरहजर असल्यास सदरील मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात येणार आहे. प्रारूप मतदार यादी पाच ऑगस्ट रोजी प्रकाशित होणार असून, त्यानंतर महिनाभर दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत.

**दुरुस्ती व बदल :**

"मतदार यादीतील नावातील चुका, पत्ता, वय किंवा फोटो यामध्ये दुरुस्ती करण्याची सुवर्णसंधी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे."

**नावे वगळणे :**

"मयत, दुबार किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या मतदारांची नावे यादीतून वगळण्याची प्रक्रियाही केली जात आहे." चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरातील विविध मतदान केंद्रांवर आणि शासकीय कार्यालय व जिल्हा परिषद शाळेत विशेष शिबिरांचे आयोजन केले जात आहे. नागरिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे जाऊन आपले अर्ज सादर उपलब्ध करून घेऊ शकतात.

## पाडेगाव येथील हजरत पठाणशाह बाबांचा आजपासून उरूस

**नीरा (दै. संध्या)**



पुरंदर तालुक्यातील नीरानजीक असलेल्या पाडेगाव (ता. खंडाळा) येथील हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाहचा ४२ वा उरूसाला येत्या सोमवारपासून (६ जुलै) प्रारंभ होत आहे. तीन दिवस हा उरूस साजरा करण्यात येणार असून पुण्यातील प्रसिद्ध रातीब हा मर्दानी खेळ यंदाच्या उरूसाचे आकर्षण ठरणार आहे. उरूस निमित्ताने धार्मिक कार्यक्रमासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पाडेगाव ( ता.खंडाळा) येथील हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबा दर्गाह अनेक वर्षांपासून आहे. हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून या दर्ग्याकडे पाहिले जाते. हजरत पीर सय्यद पठाणशाह दर्गाह उरुसनिमित्ताने ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच झाली. त्यात उत्सवाचे नियोजन आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्ताने उपक्रम राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष मुस्तफा आतार, उपाध्यक्ष रशीदभाई सय्यद, विश्वस्त इकबाल मुल्ला, मोहंम्मदगौस आतार उपस्थित होते.

"हजरत पीर सय्यद पठाणशाह बाबांचा येत्या सोमवारी ६ जुलैपासून ४२ वा उरुसाला प्रारंभ होत आहे. त्यानिमित्ताने विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. सोमवारी( दि.६)सायंकाळी दर्गाहपासून नीरा शहरातून संदलची मिरवणूक काढण्यात येणार आहे. या वर्षी दर्गाह संदलच्या मिरवणुकीत पुण्यातील प्रसिद्ध रातीब या मर्दानी खेळाचे सादरीकरण करण्यात येणार असून या वर्षाच्या उरूसचे आकर्षण ठरणार आहे. रात्री दहा वाजता ही मिरवणूक पुन्हा दर्गाह येथे येईल.त्यानंतर बाबांच्या समाधीला धार्मिक विधिवत संदल लावण्यात येणार आहे, "अशी माहिती दर्गाह ट्रस्टचे सचिव फिरोज सय्यद यांनी दिली. मंगळवारी ७ जुलैला दुस-या दिवशी ऊर्स असून बाबांच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात. नीरा, पाडेगाव, निंबुत, लोणंद, बारामती परिसरासह पुण्याहून दर्शनासाठी भाविक येत असतात. रात्री मिलादख्वाणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तिसऱ्या दिवशी ८ जुलैला सकाळी नऊ वाजता कुराण पठण होणार आहे. सकाळी ११ वाजता जियारतचा धार्मिक विधी करण्यात येईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

भाविकांनी उर्सच्या तीन दिवसाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन दर्गाह ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

## चाकण बाजारात सांबर काकडीची प्रचंड आवक; पालेभाज्यांचे भाव गडगडले

**चाकण (दै. संध्या)**



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये हिरवी मिरची, सांबर काकडी, टोमॅटो, कोबी, वाटाणा व दुधी भोपळ्याची प्रचंड आवक झाली. भेंडी, वालवड, आद्रक, चवळी, शेवगा, गवार यांचे भाव गडगडले. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव स्थिर राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ७० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,००० ते २,६०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,२५० क्विंटल झाली. गेल्या चार आठवड्यांपासून बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवरच स्थिरावत आहे. लसणाची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. लसणाला १५ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २९० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार ५०० रुपयांपासून ते ४ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,६०० रुपये, भाव क्रमांक २.१,८०० रुपये, भाव क्रमांक ३.१,०००.

बटाटा - एकूण आवक - १,२५० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.१,००० रुपये.

## वीज चोरी प्रकरणी कारवाई करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना मारहाण; पाच जणांवर गुन्हे दाखल

**जेजुरी (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील पिसर्वे येथे हॉटेल साईलीला मध्ये वीज चोरी प्रकरणी कारवाई करीत असताना वीज वितरणाच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ व मारहाण करणाऱ्या पाच जणांवर जेजुरी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

पुरंदर तालुक्यातील पिसर्वे येथील संदीप अंकुश कोलते, सचिन कांतिलाल कोलते, गणेश कोलते, वैभव कोलते, अरुण अंकुश कोलते या पाच जणांवर जेजुरी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

या प्रकरणी जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील पिसर्वे येथे दिनांक 2 जुलै रोजी वीज वितरण कंपनीचे अधिकारी साई लीला हॉटेल मध्ये वीज चोरी प्रकरणी कारवाई करण्यासाठी गेले असता. वरील पाच जणांनी दारू पिऊन येऊन बेकायदा गर्दी जमाव जमवून शासकीय कामकाजात अडथळा आणला तसेच कनिष्ठ अभियंता साबळे यांचा मोबाईल फेकून दिला तसेच महावितरन चे प्रधान तंत्रज्ञ विक्रम तुपे व वरिष्ठ अधिकारी जीवन ठोंबरे यांना हाताने मारहाण करून धक्का बुक्की केली. तसेच वैभव कोलते यांनी परत तुम्ही इकडे आलात तर हात पाय तोडू अशी धमकी दिली.

याबाबत वीज वितरणाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केली. त्यानुसार जेजुरी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी जेजुरी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार तपास करीत आहेत.

## कोंढव्यातील पिसोळी फार्महाऊसवर छापा; बेकायदा हुक्का विक्रीवर कारवाई, ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पिसोळी (दै. संध्या)**

कोंढवा परिसरातील पिसोळी येथील एका फार्म हाऊसवर काळेपडळ पोलिसांनी छापा टाकून बेकायदा हुक्का विक्री व सेवन करणाऱ्यांवर कारवाई केली. तसेच ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अनिस सय्यद व त्याचा साथीदार साद सय्यद यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील अवैध धंदे, तडीपार आरोपी व गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर काळेपडळ पोलिस ठाण्याचे पथक गस्तीवर असताना पोलिस अंमलदार महादेव शिंदे आणि अतुल पंधरकर यांना पिसोळी येथील आंबिका हॉटेल रोड, जगदंबा मार्ग परिसरातील एका फार्महाऊसमध्ये अनिस सय्यद व साद सय्यद हे बेकायदा हुक्का विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी साध्या वेशात छापा टाकला असता, तेथे ८ ते १० जण हुक्क्याचे सेवन करताना मिळून आले.

पोलिसांनी तेथून तीन चारचाकी, दोन दुचाकी, १२ मोबाईल, ८ हुक्का पॉट, तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर व इतर साहित्य असा एकूण ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत आरोपींविरुद्ध काळेपडळ पोलिस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल केला असून, सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे पुढील तपास करत आहेत. ही कारवाई पोलिस उपायुक्त जीवन बेनिवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अण्णासो बाबर यांच्या सूचनेनुसार सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे, उपनिरीक्षक रघुवीर खोडा तसेच पोलिस अंमलदार प्रवीण काळभोर, दाऊद सय्यद यांच्या पथकाने केली.

# सासवड नगरपालिका संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी सज्ज; स्वच्छता, पाणी, आरोग्य व विद्युत सुविधांची जय्यत तयारी

**नीरा (दै. संध्या)**




संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायीवारी पालखी सोहळ्यानिमित्त शनिवार (दि. ११) व रविवार (दि. १२) जुलै रोजी सासवड येथे होणाऱ्या दोन दिवसांच्या मुक्कामासाठी सासवड नगरपरिषदेने सर्व आवश्यक नागरी सुविधांची व्यापक तयारी पूर्ण केली आहे. वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, अखंडित वीजपुरवठा, प्रकाशयोजना आणि सुरक्षा व्यवस्थेवर विशेष भर देण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा आनंदिकाकी जगताप यांनी दिली.

पालखी सोहळ्यादरम्यान शहरात स्वच्छता अबाधित राहावी यासाठी नगरपरिषदेकडून १५ घंटागाड्या, ४ ट्रॅक्टर, २ जेसीबी, २ सॅक्शन (सेजिंग) मशिन्स तसेच सुमारे १५० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. पालखी तळाची नियमित स्वच्छता, रस्त्यांवरील कचरा संकलन आणि परिसर निर्जंतुक ठेवण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी पालखी तळावर विजेच्या खांबांवरील प्रकाशयोजना, तंबू परिसरात जनरेटरसह अतिरिक्त लाईटची व्यवस्था, हायमास्ट दिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. दर्शनासाठी महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था करण्यात आली असून, गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. स्वच्छतेला प्राधान्य देत पालखी तळावर महिला व पुरुषांसाठी एकूण ३२ आसनी शौचालये आणि १६ स्नानगृहे उभारण्यात आली आहेत. याशिवाय वाढत्या वारकरी संख्येचा विचार करून तात्पुरत्या स्वरूपात फायबरची सुमारे १५० अतिरिक्त शौचालये तसेच स्नानगृहांची उभारणी करण्यात आली असून त्यासाठी स्वतंत्र पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच 'निर्मलवारी' उपक्रमांतर्गत सासवड शहरातील १६ ठिकाणी सुमारे १,८०० फायबर शौचालये उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

पालखी मुक्कामादरम्यान पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये म्हणून पालखी तळ परिसरात १० ठिकाणी पाण्याच्या टाक्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पाणीपुरवठा केंद्र, हिवरे रोड, वीर रोड, वढणे वस्ती आणि बोरावके मळा येथे टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने टँकर व परिसरातील विहिरींमध्ये ब्लिचिंग पावडर टाकून पाण्याची शुद्धता राखण्याची उपाययोजनाही करण्यात आली आहे. मुक्कामाच्या कालावधीत शहरात सकाळी व संध्याकाळी अतिरिक्त पाणीपुरवठा केला जाणार आहे. वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने नगरपरिषदेच्या वतीने रुग्णवाहिका आणि आवश्यक आरोग्य कर्मचारी उपलब्ध राहणार आहेत. तसेच पुणे व सातारा जिल्हा महावितरण कार्यालयाशी समन्वय साधून पालखी सोहळ्यादरम्यान अखंडित वीजपुरवठा राखण्यासाठी आवश्यक पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी दिली.

दरम्यान, श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची महापूजा नगराध्यक्षा आनंदिकाकी जगताप यांच्या हस्ते दोन वेळा होणार आहे. संत सोपानदेव महाराज आणि संत चांगावटेश्वर महाराज पालखींच्या प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवरही विशेष नियोजन करण्यात आले आहे. पालखी तळ, पाणीपुरवठा केंद्र आणि नगरपरिषद कार्यालय येथे तीन नियंत्रण कक्ष कार्यरत राहणार आहेत. दिवे नाका येथे पालखीचे स्वागत तसेच जेजुरी नाका येथे पालखीला निरोप देण्यासाठी मंडप, ध्वनिक्षेपक आणि अन्य आवश्यक सुविधांची व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे.

भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुकर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सासवड नगरपालिका सर्व यंत्रणांसह सज्ज झाली असून, पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासनाने व्यापक नियोजन केल्याचे चित्र दिसून येत आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# केंद्र आणि राज्याच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ

## शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक: मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म शंभर वर्षांपूर्वीच समजून घेत शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले. आजही सहकार हेच ग्रामीण विकासाचे सर्वात प्रभावी साधन ठरत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असून, शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज व विकास पोहोचविण्यात सहकारी संस्थांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था आणि पदाधिकाऱ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, उद्योग मंत्री डॉ उदय सामंत, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सहकार व पुनर्वसन राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, आमदार रवींद्र चव्हाण, वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे, आमदार चित्रा वाघ, आमदार अभिजित पाटील, आमदार संजय भेंडे, राज्य सहकारी संघाचे संचालक शिवाजीराव नलावडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष, विद्याधर अनास्कर, प्रकाश दरेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने सहकार चळवळीचे मर्म खूप पूर्वी ओळखले होते. सव्वाशे वर्षांपूर्वीपासून सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यानंतरच्या काळात सहकारी पतपेढी, बँकिंग, कृषी, डेअरी, गृहनिर्माण, मार्केटिंग अशा विविध क्षेत्रांत सहकारी संस्थांची उभारणी झाली. पहिली सहकारी पतपेढी १९०४ मध्ये उभी राहिली, तर १९११ मध्ये शिखर बँकेची स्थापना झाली. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे-पाटील, वैकुंठभाई मेहता यांसारख्या अग्रणी व्यक्तींनी सहकाराला दिलेल्या दिशा-निर्देशांचे स्मरण यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज महाराष्ट्रात दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून सहकाराचे सर्वाधिक व्यापक जाळे हे याच राज्यात आहे.सहकार क्षेत्राची खरी ताकद ओळखून ६ जुलै २०२१ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात पहिल्यांदाच स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले, याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पूर्वी सहकाराला फक्त काही राज्यांपुरती मर्यादित चळवळ म्हणून पाहिले जात होते; मात्र आता सहकाराला राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पहिल्या केंद्रीय सहकार मंत्रिपदासाठी निवड झाल्याने सहकार क्षेत्राला दूरदृष्टी आणि अनुभव लाभला आहे, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करून पुढील २० वर्षांत देशाच्या 'जीडीपी'मध्ये सहकार क्षेत्राचा हिस्सा तीन पट वाढवण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने ठेवले आहे. ६३ हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचे डिजिटायझेशन, पाच वर्षांत दोन लाख नवीन 'पॅक्स' उभारण्याचा निर्णय, नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड, नॅशनल को-ऑपरेटिव्ह ऑर्गॅनिक्स लिमिटेड, भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेड, अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आणि केंद्रीय सहकारिता विद्यापीठ अशा विविध उपक्रमांमुळे सहकार क्षेत्राला नवे बळ मिळत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



सहकारी साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करण्याचा निर्णय, इथेनॉल आणि सीबीजी धोरणांमुळे साखर उद्योगाला मिळालेले संजीवनी याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. सहकारी संस्थांना ग्रामीण भागात १७ प्रकारची कामे खुली करून 'एनसीडीसी'मार्फत अर्थसाहाय्याची सोय केल्याने सहकार संस्था या ग्रामीण परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २१व्या शतकात सहकार जिवंत राहील का, कॉर्पोरेट क्षेत्राशी स्पर्धा करू शकेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता; परंतु प्रत्यक्षात सहकारी बँकांनी कॉर्पोरेट बँकांपेक्षाही चांगले काम करून दाखवले आहे. सहकारी संस्थांच्या वित्तीय प्रवेशामुळे विकास वेगाने घडत असून, महाराष्ट्रात शेवटच्या शेतकऱ्याला कर्ज पोहोचविण्याचे काम जिल्हा सहकारी बँका करीत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांपैकी ४० ते ४५ टक्के संस्था या सहकारी गृहनिर्माण संस्था असून हा घटक दीर्घकाळ उपेक्षित राहिला होता. मात्र आमदार प्रवीण दरेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सहकार कायद्यात गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र अध्याय तयार करण्यात आला आहे. या आधारावर स्वयं पुनर्विकास योजना तयार करून सहकारी सोसायट्यांना स्वतःच्या पुनर्विकासाचे अधिकार देण्यात आल्याने अनेक कुटुंबांचे मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, मुंबईतील मराठी माणसाचे घराचे स्वप्न स्वयं पुनर्विकासामुळे पूर्ण होत असून ४०० चौरस फुटांवरून १००० चौरस फुटांमध्ये राहायला जाणारे सभासद पाहून होणारा आनंद अवर्णनीय आहे. विद्यमान प्रकल्पांना अर्थसाहाय्य वाढविण्यासाठी सहकारी बँकांनी हजारो पेंडिंग प्रकल्पांना मदत करावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले. 'युडीसीपीआर'मधील अडचणी दूर करून मुंबईबाहेरील सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही स्वयं पुनर्विकास प्रक्रियेत सामावून घेता येईल असे त्यांनी सांगितले. कॉर्पोरेट जगत सामान्य माणसाला धडकी भरवते; मात्र गावातील सहकारी पतपेढी, सहकारी बँक सामान्य नागरिकांना आपली वाटते, असे सांगत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, लोकाभिमुखता आणि वित्तीय प्रवेश ही सहकाराची ताकद आहे. जिल्हा सहकारी बँकांचे संचालक लोकशाही प्रक्रियेतून निवडले जात असल्याने त्यांची सामान्य शेतकऱ्याशी बांधिलकी राहते. व्यावसायिक आणि राष्ट्रीयीकृत बँकांनीही अशी बांधिलकी जपावी असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

विधानसभा अध्यक्ष ॲड राहूल नार्वेकर म्हणाले, सहकार आणि लोकशाही या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. संविधानात सहकार क्षेत्राचा विशेष उल्लेख लोकशाही बळकटीसाठी महत्त्वाचा आहे. विकास प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग सहकार चळवळीतूनच व्यापक पद्धतीने शक्य होतो, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. सहकार विषयावर लिहिणाऱ्या लेखकांनाही यापुढे राज्य सरकारच्या वाङ्मय पुरस्कारांत समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव असल्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ उदय सामंत यांनी सांगितले. पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करत सहकार क्षेत्रातील साहित्य निर्मिती आणि संस्थात्मक कामांना राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असे डॉ सामंत यांनी सांगितले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## पावसाचे थैमान! मुंबईला रेड अलर्ट

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबईसह उपनगरात गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. पावसाचा फटका रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला देखील बसला आहे. हवामान विभागाने मुंबई महानगराला अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. याच पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना दुपारच्या सत्रात सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावं असं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेची वाहतून १० ते १५ मिनिटं उशिराने सुरू आहे. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने रस्ते वाहतुकीचा वेग मंदावला आहे. सलग चौथ्या दिवशी मुंबईत पावसाची जोरदार बॅटींग पाहायला मिळत आहे. दक्षिण मुंबईसह पूर्व आणि पश्चिम उपनगरांमध्ये दमदार पाऊस सुरू आहे. अतिमुसळधार पावसामुळे मोगरा नाला तुडुंब भरून वाहत असून, मोगरा नाला प्रणालीशी जोडलेले लहान नालेदेखील वाहत आहेत. परिणामी, परिसरातील काही रस्त्यांवर पाणी साचल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी विलंब होत आहे. तसेच समुद्राला दुपारी २ वाजून ५० मिनिटांनी ४.२६ मीटर इतकी भरती येणार आहे.

## मविआच्या आमदाराला २० कोटींची ऑफर : राऊत

मुंबई (दैनिक संध्या) : महाविकास आघाडीचा आणखी एक आमदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याचा खळबळजनक दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज केला. विधान परिषदेतील काँग्रेसचे आमदार धीरज लिंगाडे यांना शिंदे गटाकडून २० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली असून आगामी निवडणुकीत पुन्हा आमदारकीचे आश्वासनही देण्यात आल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी राम मंदिर उभारणीतील कथित भ्रष्टाचारावरून सत्ताधाऱ्यांवर अत्यंत तिखट शब्दांत हल्लाबोल केला. "राम मंदिर बांधताना यांनी चोरी केली आहे. हा चोरीचा पैसा त्यांना आणि त्यांच्या पोराबाळांना कधीही पचणार नाही. सीतामाईचे पैंजण, कंठहार आणि प्रभू रामाची आभूषणे चोरीला गेली आहेत. जर हे खरं असेल, तर या सत्ताधाऱ्यांनी विष पिऊन मेलं पाहिजे," अशा संतप्त शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. "सध्याच्या या चोरीच्या प्रकरणात २५ मेहमूद गजनवी सक्रिय असून, त्यात श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद देवगिरी यांचाही समावेश असू शकतो," असा संशय त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रुग्णालयात दाखल होण्यावर राऊत यांनी प्रसिद्ध लेखक लिओ टोल्स्टॉय यांच्या कथेचा दाखला देत खोचक टीका केली.

# बाल संरक्षण व्यवस्थेचा सविस्तर आढावा सादर करावा : राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अध्यक्ष यांना बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत जिल्ह्यातील बाल संरक्षण व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन १५ जुलै, २०२६ पर्यंत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. बाल हक्क संरक्षण आयोगाने स्पष्ट केले आहे की, हा अहवाल संबंधित विभागांकडून केवळ माहिती संकलित करून नव्हे, तर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पडताळणी करून वस्तुनिष्ठ स्वरूपात सादर करावा.

अहवालामध्ये जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत व अनोंदणीकृत निवासी संस्थांची स्थिती, त्यांच्या नोंदणीची वैधता, संरचनात्मक व अग्निसुरक्षा तपासणी, बाल कल्याण समितीचे कार्य, जिल्हा बाल संरक्षण कक्षाची कार्यक्षमता, विशेष बाल पोलीस पथक, जिल्हा तपासणी समिती, दत्तक प्रक्रिया, फॉस्टर केअर, स्पॉन्सरशिप व बालसंगोपन योजनांची अंमलबजावणी,




बालविवाह प्रतिबंध, बालकामगार निर्मूलन, बाल भिक्षेकरी पुनर्वसन, बाल लैंगिक अत्याचार प्रकरणे, सपोर्ट पर्सनची नियुक्ती तसेच जिल्हा, तालुका, ग्राम आणि वॉर्ड स्तरावरील बाल संरक्षण समित्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा अपेक्षित आहे. बाल न्याय अधिनियमातील कलम 27, कलम 106 अंतर्गत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी यांची हा आढावा घेण्याची जबाबदारी बाल न्याय कायद्यात दिसून येते. त्यामुळे या जबाबदारी अंतर्गत जिल्ह्यातील आढावा घेऊन आवश्यक शिफारशींसह अहवाल सादर करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत.

आयोगाने नमूद केले आहे की, प्राप्त अहवालांचे परीक्षण केल्यानंतर आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यांना प्रत्यक्ष भेटी, पाहणी, सुनावणी तसेच आवश्यक शिफारशी राज्य शासनाकडे सादर करण्यात येतील. निर्धारित मुदतीत अहवाल प्राप्त न झाल्यास आयोग उपलब्ध नोंदींच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही करणार आहे.

राज्यातील प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानजनक आणि बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देतानाच संपूर्ण महाराष्ट्राची 'बालस्नेही महाराष्ट्र' म्हणून ओळख निर्माण व्हावी यासंदर्भात बाल संरक्षण व्यवस्थेची परिणामकारक अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि उत्तरदायित्व अधिक मजबूत करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

# सोमनाथ मंदिर आस्थेच्या केंद्रासोबतच राष्ट्रीय स्वाभिमानाचे प्रतीक – मंत्री ॲड. आशिष शेलार

■ मुंबई (दै. संध्या)

सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित 'सोमनाथ स्वाभिमान पर्व – अखंड श्रद्धेची १००० वर्षे' या विशेष सांस्कृतिक उपक्रमास मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथून रेल्वेमार्गे प्रारंभ झाला.

यावेळी सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सहभागी नागरिकांशी संवाद साधतांना ते म्हणाले, "सोमनाथ मंदिर केवळ आस्थेच्या केंद्रासोबतच राष्ट्रीय स्वाभिमान, सांस्कृतिक अस्मिता आणि भारतीय सभ्यतेच्या अखंड परंपरेचे प्रतीक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सोमनाथ मंदिराचा इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि त्यामागील प्रेरणादायी परंपरा अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे."

या यात्रेत सहभागी नागरिकांना सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन, मंदिराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा तसेच भारतीय परंपरेतील त्याचे महत्त्व यांची माहिती देण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, संवाद सत्रे आणि भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास विधानसभा सदस्य संजय उपाध्ये, नगरसेवक शिवा शेट्टी, आयआरसीटीसीचे अतिरिक्त कार्यकारी प्रबंधक हर्षवर्धनसिंग रावत तसेच रेल्वेचे अतिरिक्त वाणिज्य व्यवस्थापक अमित करवंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी सांगितले की, राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच अभिजात कला, लोककला आणि भारतीय परंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' या उपक्रमामुळे सोमनाथच्या वैभवशाली इतिहासाचा, अध्यात्मिक परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा परिचय अधिक व्यापकपणे होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# रेशनिंग उत्पन्न मर्यादा वाढीसाठी आझाद मैदानात निदर्शने; शासनाकडून सकारात्मक आश्वासन

■ मुंबई (दै. संध्या)

रेशन कार्डसाठी लागू असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे तसेच उत्पन्न मर्यादा ओलांडल्याच्या कारणावरून रेशन कार्ड रद्द करण्याची कारवाई तातडीने थांबविण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी आज मुंबईतील आझाद मैदान येथे रेशनिंग कृती समितीच्या वतीने निदर्शने करण्यात आली. आंदोलनानंतर कृती समितीच्या शिष्टमंडळाने शहरी भागासाठी सध्या अस्तित्वात असलेले 59 हजार वार्षिक उत्पन्न ऐवजी 3 लाख 60हजार रुपये वार्षिक उत्पन्न मर्यादा तसेच ग्रामीण भागासाठी वार्षिक 44 हजार ऐवजी 2 लाख 40 हजार वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत 500 सह्यांचे अर्जा सोबत मागण्याचे निवेदन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव श्री. अत्राम यांची भेट घेऊन सादर करण्यात आले.

यावेळी शासनाच्या वतीने पुढील आश्वासने देण्यात आली. रेशन कार्ड उत्पन्न मर्यादा वाढीबाबत नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल येत्या १५ दिवसांत प्रकाशित करण्यात येईल. उत्पन्न मर्यादीच्या कारणावरून रेशन कार्ड रद्द करण्याची सुरू असलेली प्रशासकीय कारवाई थांबविण्यासाठी परिपत्रक जारी करण्यात येईल. दरम्यान आंदोलनस्थळी भेट देणारे नामदार गिरीश



महाजन आणि दादा भुसे कॅबिनेट मंत्री आणि विधान परिषद आमदार मनीषा कायंदे यांनीही आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत भेट घेतली.

आंदोलनकर्त्यांच्या रेशन कार्ड उत्पन्न मर्यादा वाढीबाबत शासन सकारात्मक भूमिका घेत असून लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.रेशनिंग कृती समितीने शासनाच्या या आश्वासनांचे स्वागत केले असून, समितीचा अहवाल आणि शासन निर्णय निर्धारित कालावधीत जाहीर न झाल्यास पुन्हा एकदा तीव्र लोकआंदोलन करण्याचा जगदीश पाटणकर- 9867551952 यांनी इशारा दिला आहे. या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, रेशन कार्डधारक महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शिक्षणप्रवासासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लालपरी' ही केवळ प्रवासी वाहतुकीचे साधन नसून राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्ज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्याचे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ अनेक दशकांपासून प्रभावीपणे पार पाडत असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत शालेय वेळेत बसस्थानकांवर पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास मदत करतात. तसेच, प्रवासादरम्यान कोणतीही अडचण उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळाने स्वतंत्र टोल-फ्री मदत केंद्र सुरू केले असून त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.



राज्यात दररोज सुमारे ३० हजार १७७ शालेय फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना सुरक्षित व नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये, यासाठी एसटी महामंडळ विविध सवलतींच्या योजना प्रभावीपणे राबवत आहे.

अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या मुलींना शंभर टक्के मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली आहे. शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्के सवलत, मासिक विद्यार्थी पासवर ६६.६७ टक्के सवलत तसेच उन्हाळी सुट्टी, परीक्षा, शैक्षणिक शिबिरे किंवा आजारी पालकांना भेट देण्यासाठीच्या प्रवासासाठीही ५० टक्के सवलत देण्यात येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २५.१३ लाख अहिल्याबाई होळकर पास आणि २७.९८ लाख विद्यार्थी मासिक पास वितरित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रियाही सुरू असून त्यामुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होणार आहे. कौशल्य सेतू अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत दिली जात आहे. तसेच मानव विकास योजनेअंतर्गत राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये ९६६ बसेसद्वारे ७३ हजार ६२१ मुलींना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

"एसटीची 'लालपरी' ही आज केवळ रस्त्यावर धावणारी बस नसून प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांची सारथी, प्रत्येक पालकाच्या विश्वासाची हमी आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी अविरत धावणारी ज्ञानवाहिनी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप अखंड तेवत ठेवण्यासाठी एसटी महामंडळ अधिक सक्षमपणे, संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेने कार्य करत राहील," असा विश्वास परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माऊलींच्या वैभवशाली रथाच्या मानाच्या बैलजोडीची शाही मिरवणूक उत्साहात

आळंदी (दैनिक संध्या) : श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पालखी सोहळ्यातील वैभवशाली चांदीच्या रथाला आळंदीतील शेतकरी तुळशीराम रानवडे, हर्षवर्धन रानवडे यांच्या वतीने जुंपण्यात येणाऱ्या मानाच्या बैलजोडीची शाही मिरवणूक रविवारी आळंदीत भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली. हलगी, बॅण्ड, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यंदाच्या पालखी सोहळ्यात मानाच्या बैलजोडीचा मान शेतकरी तुळशीराम रानवडे, हर्षवर्धन रानवडे आणि उमेश रानवडे यांना मिळाला आहे. त्यांच्या बैलजोड्या अनुक्रमे पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वैभवशाली चांदीच्या रथाची सेवा बजावणार आहेत. स्वामींच्या मठाजवळ आळंदी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड. रोहिणी पवार तसेच बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत मानाच्या बैलजोडीचे विधीवत पूजन करण्यात आले.चाकण चौकातून मिरवणुकीला प्रारंभ झाला. प्रदक्षिणा मार्गे मार्गक्रमण करत मिरवणुकीचा समारोप महाद्वार चौकात झाला. समारोपानंतर श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर समितीच्या वतीने मानाच्या बैलजोडीचे विधीवत पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, बैलजोडी समिती सदस्य शिवाजी रानवडे, विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, ज्ञानोबा वहीले, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, माजी नगरसेवक डी.डी.भोसले, विष्णू वाघमारे, सागर भोसले, महेश कुऱ्हाडे, संकेत वाघमारे, सचिन रानवडे, प्रियेश रानवडे, पांडुरंग रानवडे, सौरभ रानवडे, तुषार रानवडे यांच्यासह आळंदीतील ग्रामस्थ आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकरी संप्रदायात माऊलींच्या रथाला जुंपण्यात येणाऱ्या मानाच्या बैलजोडीला विशेष धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व आहे.



### प्रकाशभाऊ राजनकर यांचा आदर्श घ्या - महेशदादा शेवकरी

चाकण (दैनिक संध्या) : कलेची कदर करून कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी भोसे (ता. खेड ) येथे विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घेणारे शिवसेनेचे चाकण शहर उपप्रमुख व उद्योजक प्रकाशभाऊ राजनकर यांचा आदर्श घेण्याची गरज आहे, असे गौरव उदगार शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख व नगरसेवक महेशदादा शेवकरी यांनी काढले. शिवसेनेच्या साठाव्या वर्धापन दिनानिमित्त व नगरसेवक महेशदादा शेवकरी यांच्या वाढदिवसानिमित्त भोसे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हस्तलिखित चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धांना शाळेतून प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती निवृत्ती गाडेकर यांनी दिली. प्रत्येकी तीन विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी बक्षीस वाटप करण्यात आले. शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख व नगरसेवक महेशदादा शेवकरी व उपप्रमुख प्रकाशभाऊ राजनकर यांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी युवासेनेचे शहर प्रमुख अभिजित जाधव, युवा सेनेचे उपशहर प्रमुख मयुर भूरूक, उपशहर प्रमुख व उद्योजक प्रकाशभाऊ साहेबराव राजनकर, सुधीर लोणारी, मनोहर शेवकरी, स्वप्नील केदारी, योगेश पाटील, योगेश आमराळे, रवीभाऊ शेखार, अनुराग सिंग, विजूभाऊ मेसरे, नितीन गोरे, मयुर शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'देऊळबंद-२'च्या टीमचा 'सूर्यदत्त' संस्थेकडून गौरव

पुणे (दै. संध्या)



मराठी चित्रपटसृष्टीत सध्या गाजत असलेल्या 'देऊळबंद-२' या चित्रपटाच्या यशस्वी टीमचा सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल अभिनेत्री स्नेहल तरडे आणि लेखक-दिग्दर्शक-अभिनेते प्रवीण तरडे यांना 'सूर्यभारत सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. याप्रसंगी 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, विद्यावाचस्पती विद्यानंद, चित्रपटाचे निर्माते कैलास वाणी व जुईली वाणी, वरिष्ठ पत्रकार किरण जोशी, माध्यम सल्लागार जीवराज चोले आदी उपस्थित होते.

सूर्यदत्तचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त कोथरूड येथील सिटीप्राईड चित्रपटगृहात 'देऊळबंद-२' चित्रपटाचा विशेष विनामूल्य शो आयोजित करण्यात आला. यावेळी निर्माते कैलास वाणी व जुईली वाणी, प्रवीण तरडे, स्नेहल तरडे, चित्रपटातील कलाकार, तांत्रिक टीम, सूर्यदत्तचे विद्यार्थी, प्राध्यापक आणि चित्रपटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात कलाकारांचा सत्कार करून त्यांच्या चित्रपटसृष्टीतील योगदानाचा गौरव करण्यात आला.

शेतकरी आत्महत्या या ज्वलंत विषयाला धरून असलेल्या 'देऊळबंद-२'ने प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला आहे. श्रद्धा, संस्कृती, ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामाजिक मूल्ये यांची प्रभावी सांगड घालत या चित्रपटाने मनोरंजनासोबतच विचारप्रवर्तक आशयही मांडला आहे. प्रभावी कथा, दमदार संवाद, वास्तववादी अभिनय आणि तांत्रिकदृष्ट्या दर्जेदार मांडणीमुळे हा चित्रपट सर्व स्तरातील प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असून, मराठी चित्रपटसृष्टीतील महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक म्हणून त्याची चर्चा होत आहे. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "शेतकऱ्यांची करुण कहाणी मांडणारा 'देऊळबंद-२' चित्रपट आहे. यातून केवळ मनोरंजन नाही, तर भारतीय संस्कृती, श्रद्धा, समर्पण, सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष प्रभावीपणे मांडणारी कलाकृती आहे. समाजात सकारात्मक विचार रुजविण्याची ताकद अशा चित्रपटांमध्ये असते. शिक्षणाबरोबरच समाजाभिमुख संस्कार घडविण्याचे कार्य कला आणि साहित्य करतात. त्यामुळे अशा दर्जेदार कलाकृती आणि त्यामागील कलाकारांचा गौरव करणे ही सूर्यदत्तची परंपरा आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणातच नव्हे, तर समाजाशी जोडणाऱ्या आणि मूल्यांची जपणूक करणाऱ्या कलाकृतींकडूनही प्रेरणा घ्यावी. 'देऊळबंद-२'सारखे चित्रपट सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करतात."

प्रवीण तरडे म्हणाले, "महाराष्ट्रासह जगभरातील मराठी प्रेक्षकांनी 'देऊळबंद-२'ला भरभरून प्रेम दिले. हा सन्मान माझा किंवा स्नेहलचा नसून, संपूर्ण चित्रपटाच्या टीमचा आहे. प्रत्येक कलाकार, तंत्रज्ञ आणि पडद्यामागील सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाले आहे. आशयप्रधान आणि व्यावसायिकदृष्ट्या सक्षम मराठी चित्रपटांची नवी ओळख निर्माण करण्यात 'देऊळबंद-२' महत्त्वाची भूमिका बजावेल. हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील 'माईलस्टोन' ठरेल, असा मला विश्वास आहे. या चित्रपटाच्या कमाईतून मिळणारा संपूर्ण नफा आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी खर्च केला जाणार आहे." सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे कला, साहित्य, शिक्षण, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी दरवर्षी विविध पुरस्कार प्रदान केले जातात. त्याच परंपरेचा भाग म्हणून यंदाचा 'सूर्यभारत सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' स्नेहल तरडे आणि प्रवीण तरडे यांना प्रदान करण्यात आल्याचे सुषमा चोरडिया यांनी नमूद केले. प्रा. डॉ. सुनील धनगर यांनी सूत्रसंचालन केले.

# इंद्रायणी प्रदूषित करणाऱ्यांची गय नाही; कठोर कारवाईचे महापौर रवी लांडगे यांचे निर्देश

आळंदी (दै. संध्या)



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीमध्ये दिसून आलेल्या फेसाच्या घटनेची महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, गटनेते सचिन गिलबिले, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महापौर रवी लांडगे म्हणाले, "इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरण अबाधित राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नदी प्रदूषित करणाऱ्या कोणत्याही आस्थापनेची गय केली जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी अशा आस्थापनांवर तातडीने कठोर कारवाई करावी आणि सातत्याने निरीक्षण ठेवावे," असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो वारकरी आणि भाविक आळंदीत दाखल होणार असल्याने त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि निर्मळ वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचेही महापौरांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनीही इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. "इंद्रायणी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे केंद्र असून तिचे पावित्र्य जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नगरपरिषद नदी स्वच्छता, प्रदूषण नियंत्रण आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. प्रशासन, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि नागरिकांच्या समन्वयातून इंद्रायणीचे पावित्र्य कायम राखले जाईल," असे त्यांनी सांगितले. पाहणीनंतर संबंधित विभागांना नदीतील फेस निर्माण होण्यामागील कारणांचा सखोल तपास करून तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

## एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषि अधिकाऱ्यांकडून पेरणी योग्य पाऊस होईपर्यंत पेरण्या न करण्याचे आवाहन

कोरेगावमुळ (दै. संध्या)

यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे सर्वदूर शेतकरी वर्गामध्ये हतबलता दिसून येत आहे. त्याच अनुषंगाने कटिबद्ध कृषि विभाग तालुका कृषि अधिकारी, हवेली अमित रणवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या बांधावर निरनिराळ्या मोहिमांचे आयोजन करुन त्यांना एल निनोची संकल्पना स्पष्ट करत आहेत.

याच धर्तीवर बिवरी येथे कृषि अधिकारी यांच्यामार्फत मोहिम राबविण्यात आली. यात प्रास्ताविकात सहाय्यक कृषि अधिकारी राहुल तायडे यांच्याद्वारे खरीप हंगामात पिकांचे, खतांचे, आंतरमशागतीची कामे, किड-रोग व्यवस्थापन व पाणीपाळी यांचे हंगामात योग्य नियोजन कसे करावे याची माहिती देण्यात आली.

तसेच बियाण्यांच्या, खतांच्या व फवारणीच्या खर्चात बचत व्हावी म्हणून उगवण क्षमता तपासणी, बिज प्रक्रिया या बाबी प्रात्यक्षिकाद्वारे करुन दाखवण्यात आल्या. त्यानंतर उप कृषि अधिकारी, जी. एम. सुरवसे यांनी ऊसासाठी बेणे प्रक्रिया, सुपर केन नर्सरी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



# बेल्हे येथे ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

**केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून होणार उद्घाटन**

आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह तसेच केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त बेल्हे (ता. जुन्नर) येथील बेल्हे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेडच्या ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

सन १९१७ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे सध्या ३,६३२ सभासद असून संस्थेच्या मालकीचे बेल्हे येथील व्यापारी संकुल तसेच अद्ययावत संगणकीकृत कार्यालय कार्यरत आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने संस्थेमार्फत मध्यम मुदत, अल्पमुदत पीक कर्ज, ट्रॅक्टर, गाई-गोठा, पाइपलाइन, शेळीपालन, कुक्कुटपालन, जीप व कार यासाठी कर्जपुरवठा करण्यात आला आहे. आजअखेर संस्थेने सुमारे २७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण केले असून बँक पातळीवर १०० टक्के आणि संस्था पातळीवर ९० टक्के कर्जवसुली झाली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला लेखापरीक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाला असून सभासदांना सातत्याने १५ टक्के लाभांश देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या जागतिक स्तरावरील धान्य गोदाम (WLGS) आणि कृषी पायाभूत सुविधा निधी (AIF) योजनेअंतर्गत संस्थेला ५०० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम मंजूर झाले आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ६५.६२ लाख रुपये खर्च अपेक्षित असून त्यापैकी ५६.८७ लाख रुपयांचे कर्ज पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत मंजूर करण्यात आले आहे. या कर्जावर चार टक्के व्याजदर असून सात वर्षांत परतफेड करावयाची आहे. तसेच केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून तीन टक्के व्याज अनुदान आणि ३३ टक्के भांडवली अनुदान मंजूर असून त्यातील ५० टक्के अनुदान संस्थेच्या खात्यावर प्राप्त झाले आहे.

या प्रकल्पासाठी केंद्रीय व राज्य सहकार विभाग, राज्य सहकारी बँक, नाबार्ड, एनसीसीएफ, एमसीडीसी तसेच इतर सहकारी संस्थांचे सहकार्य लाभले आहे. या गोदामामुळे संस्थेच्या उत्पन्नात वाढ होण्यासह धान्य साठवणूक व व्यवसायाला चालना मिळणार आहे.

या उद्घाटन कार्यक्रमास खासदार डॉ. अमोल कोल्हे, महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, आमदार शरद सोनवणे, आमदार अतुल बेनके, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, संचालक ॲड. संजयराव काळे, संचालिका पूजा बुट्टे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, तालुक्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सभासद, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत.

# विषमुक्त अन्नासाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब गरजेचा - तावरे

बारामती (दै. संध्या)




काळाची गरज लक्षात घेता सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यावर भर दिला पाहिजे. रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अतिवापर टाळून विषमुक्त अन्नधान्य,फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन वाढविणे ही आजची गरज आहे.नागरिकांनीही विषमुक्त फळे व भाजीपाला थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन द्यावे,असे आवाहन पंचायत समितीचे सभापती किरण तावरे यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 1 जुलै रोजी पंचायत समिती येथे कृषी दिन साजरा साजरा करण्यात आला. यावेळी पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी आगवणे, गटनेते बाबा चोरमले,सदस्य नितीन काकडे,उज्वला खैरे,आशा वायाळ, उप विभागीय कृषी अधिकारी रश्मी जोशी,गटविकास अधिकारी किशोर माने,तालुका कृषी अधिकारी सचिन हाके,कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.धीरज शिंदे व विषय विशेषज्ञ संतोष करंजे,शेतकरी सन्मान समितीचे अध्यक्ष अशोक तावरे,आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील शेतकऱ्यांनी सूर्यफूल, बाजरी,सोयाबीन या पिकामध्ये राज्यस्तरीय तसेच तालुकास्तरीय पीक स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये कऱ्हाटी येथील नारायण बाबा लोणकर यांनी सुर्यफूल पीकात प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय 50 हजार रुपयांचे बक्षीस मिळविले आहे, यावेळी त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

श्री.चारेमले यांनी बदलत्या हवामानचा अभ्यास करून शेतकऱ्यांनी शेती करावी.कृषी विभागाच्या सल्ला विचारात घेता पीकाचे नियोजन करावे,असेही श्री. चोरमले म्हणाले.

श्री.माने म्हणाले,गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येवून शेतकरी उत्पादक गट तयार तयार करावा. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा,असेही ते म्हणाले. श्री.हाके यांनी कृषी विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देवून ते पुढे म्हणाले,फळ पिकांचा शेतकऱ्यांनी विमा काढून घ्यावा. हवामान बदलामुळे होणाऱ्या नुकसानामुळे शेतकऱ्यांना या विम्याचा लाभ होईल,असेही श्री. हाके म्हणाले.

# पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री आबिटकर यांची सासवड पालखी तळाला भेट

नीरा (दै. संध्या)



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सासवड येथील पालखी मुक्काम मैदानाला भेट देत आरोग्य सेवा, स्वच्छता आणि वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची सविस्तर पाहणी केली. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवड येथे दोन दिवस मुक्कामी राहणार असल्याने लाखो वारकऱ्यांची होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने केलेल्या तयारीचा त्यांनी आढावा घेतला.

यावेळी मंत्री आबिटकर यांनी तात्पुरत्या आरोग्य केंद्रांची व्यवस्था, रुग्णवाहिका सेवा, आवश्यक औषधसाठा, डॉक्टर व परिचारिकांची वैद्यकीय पथके, आपत्कालीन उपचार सुविधा तसेच स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रत्यक्ष पाहणी केली. वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, तसेच गरज पडल्यास तातडीने उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी आरोग्य विभागाने दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पालखी सोहळ्यादरम्यान उष्माघात, संसर्गजन्य आजार, अपघात किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, औषधे आणि वैद्यकीय उपकरणे सज्ज ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. स्वच्छता राखणे, सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करणे आणि वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पालखी सोहळा सुरळीत, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरणात पार पडावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.